संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ०५.०९.२०२६ | अंक नं. १३४ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020






















# दहीहंडीचा जल्लोष; मुंबईत २२ गोविंदा जखमी, पुण्यात एका महिलेचा मृत्यू

मुंबई – भगवान श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवानिमित्त साजऱ्या होणाऱ्या दहीहंडी उत्सवाचा जल्लोष मुंबईसह राज्यभरात पाहायला मिळत आहे. मुंबईत दुपारी १२ वाजेपर्यंत दहीहंडी फोडताना २२ गोविंदा जखमी झाले. यापैकी २१ जणांना उपचारानंतर रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून, एका गोविंदावर उपचार सुरू आहेत. तर पुणे येथे दहीहंडी उत्सव संपल्यानंतर सांगाडा उतरविताना तो सांगाडा अंगावर पडून एका महिलेचा मृत्यू झाला.

मुंबईतील शासकीय तसेच मुंबई महापालिकेच्या विविध रुग्णालयांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई शहरातील विविध रुग्णालयांमध्ये २० गोविंदा जखमी झाले. उपचारानंतर सर्वांना घरी सोडण्यात आले. पूर्व उपनगरातील रुग्णालयात एक गोविंदा जखमी झाला असून त्यालाही उपचारानंतर डिस्चार्ज देण्यात आला आहे. पश्चिम उपनगरातील रुग्णालयात दाखल झालेल्या एका गोविंदावर उपचार सुरू आहेत.

मुंबईतील घाटकोपर येथे मनसेच्या गणेश चुक्कल यांच्या दहीहंडीमध्ये अखिल मालपा डोंगरी अंधेरी पूर्व या गोविंदा पथकाने यंदा पहिले नऊ थर उभारले. मुंबईत यंदा नऊ थरांचा विक्रम करणारे हे पहिले पथक ठरले. नऊ थर उभारल्यानंतर खाली उतरत असताना नवव्या थरावरील एक गोविंदा अचानक कोसळला. या घटनेत तो जखमी झाला.

दरम्यान, पुण्यातील जुन्या सांगवी परिसरात दहीहंडी उत्सव संपल्यानंतर लोखंडी सांगाडा (स्ट्रक्चर) काढताना भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत सलमा सलाउद्दीन पठाण (वय ४५) या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. दहीहंडीचा कार्यक्रम संपल्यानंतर रात्री सुमारे अकराच्या सुमारास मंडळाचे कार्यकर्ते लोखंडी सांगाडा खाली उतरवत होते. त्यावेळी सांगाड्याचा एक अवजड भाग अचानक खाली उभ्या असलेल्या सलमा यांच्या डोक्यावर पडला. या दुर्घटनेत त्या गंभीर जखमी झाल्या. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.










जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# विद्यार्थ्यांसाठी ‘पंडित दीनदयाळ स्पर्श फिलाटेली शिष्यवृत्ती योजना’




नगर – इयत्ता ६ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांमध्ये टपाल तिकिटे जमविण्याचा छंद निर्माण व्हावा यासाठी भारतीय टपाल खात्याने ३ नोव्हेंबर २०१७ पासून ‘पंडित दीनदयाळ स्पर्श ही फिलाटेली शिष्यवृत्ती योजना’ सुरू केली आहे.

सदर योजना अहिल्यानगर जिल्हा व शहरात पोस्ट ऑफिस आणि पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा पंधरवड्यात राबविण्यात येणार आहे. अहिल्यानगर डाक विभागाचे वरिष्ठ अधीक्षक विलास पालवे यांनी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे मुकुल गंधे व कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल यांच्याकडे शिष्यवृत्ती योजनेचे पत्र दिले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषदेचे श्रीकांत नांदापूरकर उपस्थित होते.

या योजनेंतर्गत ज्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आलेख उज्ज्वल आहे आणि ज्यांना टपाल तिकीट संग्रहाचा छंद आहे, अशा विद्यार्थ्यांची फिलाटेली प्रश्नमंजुषा आणि फिलाटेली प्रकल्पच्या आधारे निवड करून शिष्यवृत्ती देऊन प्रोत्साहन दिले जाते.

या योजनेसाठी मुकुल गंधे यांनी विशेष परिश्रम घेतले तर सुरज अग्रवाल यांनी पाठपुरावा केला.

ही योजना अहिल्यानगर शहरातील सर्व शाळांमध्ये लवकरच राबविण्यात येणार असल्याची माहिती पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी दिली आहे.

## आपला संपूर्ण प्रवास एकाच गिअरमध्ये होत नाही गुंतवणूकही एकाच पद्धतीने करत राहिल्यास प्रवास लांबवू शकते


राजन कुटे

गाडी चालवताना आपण परिस्थितीनुसार गिअर बदलतो. सुरुवातीला वेग वाढवण्यासाठी वेगळा गिअर, चढ चढताना वेगळा, उतारावर नियंत्रणासाठी वेगळा आणि महामार्गावर वेगळा. संपूर्ण प्रवास एकाच गिअरमध्ये करण्याचा आग्रह धरला, तर गाडी पुढे जाईलही; पण प्रवास कार्यक्षम, आरामदायी किंवा सुरक्षित होईलच असं नाही. आयुष्याच्या आर्थिक प्रवासातही काहीसं असंच घडतं. आपण अनेकदा गुंतवणुकीची सुरुवात एका पद्धतीने करतो आणि वर्षानुवर्षे तीच पद्धत चालू ठेवतो. उद्दिष्टं बदलतात, जबाबदाऱ्या बदलतात, उत्पन्न बदलतं, जोखीम घेण्याची क्षमता बदलते; पण गुंतवणुकीची रचना मात्र तशीच राहते. इथेच आर्थिक प्रवास अनावश्यकपणे लांबण्याची शक्यता निर्माण होते.

गुंतवणुकीचा प्रवास हा केवळ अधिकाधिक पैसा जमा करण्याचा प्रवास नसतो. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर पैशाची भूमिका बदलत जाते. करिअरच्या सुरुवातीला वेळ ही सर्वात मोठी ताकद असते. उत्पन्न मर्यादित असलं तरी दीर्घ कालावधी उपलब्ध असतो. त्यामुळे वाढीला प्राधान्य देणारी भूमिका स्वाभाविक असते. पुढे कुटुंब, घर, मुलांचं शिक्षण आणि इतर जबाबदाऱ्या वाढू लागतात. त्या वेळी केवळ वाढ पुरेशी राहत नाही; संरक्षण, तरलता आणि उद्दिष्टांनुसार नियोजन यांचं महत्त्व वाढतं. निवृत्ती जवळ येऊ लागली की समीकरण पुन्हा बदलतं. तेव्हा प्रश्न केवळ ‘किती वाढ मिळेल?’ हा राहत नाही; तर ‘आतापर्यंत तयार केलेलं सुरक्षितपणे पुढच्या आयुष्यासाठी कसं वापरता येईल?’ हा अधिक महत्त्वाचा ठरतो.

याचा अर्थ प्रत्येक बाजारातील बदलानुसार गुंतवणूक बदलत राहावी असा अजिबात नाही. उलट, बाजाराच्या हालचाली पाहून सतत गिअर बदलणारा चालकही प्रवास बिघडवू शकतो. बदल हा बाजाराच्या मूडनुसार नव्हे, तर आयुष्याच्या टप्प्यानुसार आणि उद्दिष्टांच्या जवळीनुसार असायला हवा. बाजारातील चढउतार हा प्रवासाचा भाग आहे; पण जीवनातील बदल हे प्रवासाच्या गरजा बदलतात.

उदाहरणार्थ, निवृत्तीसाठी सुरू केलेली दीर्घकालीन गुंतवणूक आणि पुढील तीन वर्षांत लागणाऱ्या मुलांच्या शिक्षणासाठी राखून ठेवलेला पैसा यांची भूमिका सारखी असू शकत नाही. दोन्ही ठिकाणी ‘दीर्घकालीन गुंतवणूक चांगली’ हा एकच नियम लावणं म्हणजे वेगवेगळ्या रस्त्यांवर एकाच गिअरमध्ये गाडी चालवण्यासारखं आहे. उद्दिष्ट जितकं जवळ येतं, तितकं त्यासाठीच्या पैशाचं स्वरूप बदलण्याची गरज निर्माण होऊ शकते. वाढीच्या टप्प्यातील पैसा आणि वापराच्या जवळ आलेला पैसा यांच्याकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणं नेहमीच योग्य असेल असं नाही.

म्हणूनच आर्थिक नियोजनात ‘एकदा गुंतवणूक केली की काम संपलं’ अशी कल्पना अपुरी आहे. गुंतवणूक सुरू करणं हा प्रवासाचा पहिला टप्पा आहे; तिचं आयुष्यभर योग्य व्यवस्थापन करणं हा त्याहून महत्त्वाचा भाग आहे. काही वेळा गुंतवणुकीची रचना बदलावी लागते, काही वेळा asset allocation मध्ये समतोल साधावा लागतो, तर काही वेळा एखादं उद्दिष्ट पूर्ण झाल्यानंतर त्या पैशाला नवीन भूमिका द्यावी लागते. यालाच व्यापक अर्थाने गुंतवणुकीचा जीवनचक्रानुसार विचार म्हणता येईल.

इथे एक धोका मात्र टाळायला हवा. ‘बदल आवश्यक आहे’ याचा अर्थ सतत बदल आवश्यक आहे असा होत नाही. वारंवार योजना बदलणं, प्रत्येक नवीन संधीचा पाठलाग करणं किंवा मागील वर्षी चांगली कामगिरी केलेल्या पर्यायांकडे धाव घेणं हे गिअर बदलणं नाही; तो अनेकदा दिशाच बदलण्याचा प्रयत्न असतो. आर्थिक प्रवासात गंतव्य स्पष्ट असेल, तर प्रत्येक वळणावर नवीन रस्ता शोधण्याची गरज नसते. गरज असते ती प्रवासाच्या परिस्थितीनुसार योग्य गती आणि योग्य पद्धत निवडण्याची. याच कारणामुळे नियमित पुनरावलोकन महत्त्वाचं ठरतं. पुनरावलोकन म्हणजे प्रत्येक वेळी काहीतरी बदलणं नव्हे. अनेकदा पुनरावलोकनाचा सर्वात योग्य निष्कर्ष ‘काहीही बदलण्याची गरज नाही’ हाही असू शकतो. पण तो निर्णय जाणीवपूर्वक घेतलेला असतो. आपल्या उत्पन्नात बदल झाला आहे का, नवीन जबाबदाऱ्या आल्या आहेत का, एखादं उद्दिष्ट जवळ आलं आहे का, जोखीम घेण्याची क्षमता बदलली आहे का–या गोष्टींकडे वेळोवेळी पाहिल्याशिवाय जुन्या पद्धतीची उपयुक्तता कायम आहे की नाही, हे समजणं कठीण होतं.

गुंतवणुकीतील शिस्त म्हणजे एकाच गोष्टीला आयुष्यभर चिकटून राहणं नाही. शिस्त म्हणजे ठरलेल्या उद्दिष्टाशी प्रामाणिक राहून, परिस्थिती बदलल्यावर आवश्यक ते बदल शांतपणे करणं. गंतव्य कायम ठेवून प्रवासाची पद्धत बदलता येते. किंबहुना, अनेकदा तेच शहाणपणाचं असतं.

आपल्या आर्थिक प्रवासात सुरुवातीचा वेग महत्त्वाचा असतो, पण पुढे नियंत्रण अधिक महत्त्वाचं ठरू शकतं. संपत्ती निर्माण करताना वाढ आवश्यक असते; संपत्ती वापरण्याचा काळ जवळ आला की तिचं संरक्षणही तितकंच महत्त्वाचं होतं. एका टप्प्यावर जोखीम घेणं योग्य असू शकतं, तर दुसऱ्या टप्प्यावर तीच जोखीम अनावश्यक ठरू शकते. बदल हा चुकलेल्या निर्णयाची कबुली नसतो; तो बदललेल्या परिस्थितीची जाणीव असतो.

म्हणूनच चांगली गुंतवणूक ही केवळ योग्य पर्याय निवडण्याबद्दल नसते. ती योग्य वेळी त्या पर्यायाची भूमिका समजून घेण्याबद्दलही असते. आयुष्य पुढे सरकत असताना आपल्या पैशाची जबाबदारी बदलते. त्या बदलाला ओळखून गुंतवणुकीची रचना विकसित होत राहिली, तर आर्थिक प्रवास अधिक स्पष्ट आणि उद्दिष्टपूर्ण होऊ शकतो. आपला संपूर्ण प्रवास एकाच गिअरमध्ये होत नाही. गुंतवणूकही एकाच पद्धतीने करत राहिल्यास आर्थिक प्रवास अनावश्यकपणे लांबवू शकते. गंतव्य बदलण्याची गरज नसते; पण ते गाठण्यासाठी प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर योग्य गती, योग्य संतुलन आणि योग्य रचना आवश्यक असते.

स्पष्ट ठेवा, शांत ठेवा.

– **राजन कुटे**, अँफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

# ‘नाट्य परिषद करंडक’ खुला राज्यस्तरीय एकांकिका महोत्सवाचे नगरमध्ये आयोजन




नगर – रंगभूमीची मध्यवर्ती संघटना असलेली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबई आयोजित, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनानिमित्त सुरू झालेला ’नाट्यकलेचा जागर’ भव्य राज्यस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धा महोत्सवात सलग तिसऱ्या वर्षी देखील ’नाट्य परिषद करंडक’ रूपात आयोजित करण्यात आला आहे असे परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी सांगितले. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील कलावंत, नाट्यकर्मींसाठी हा स्पर्धात्मक महोत्सव राज्यस्तरावर आयोजित केला असून या स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील सर्व कलावंतांनी भाग घ्यावा असे आवाहन उपाध्यक्ष (उपक्रम) भाऊसाहेब भोईर यांनी केले आहे.

मागील वर्षी हा स्पर्धात्मक महोत्सव महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर यशस्वीरित्या सादर झाला. मागील वर्षी २५८ एकांकिका या महोत्सवात सादर झाल्या, अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांसाठी नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, नाट्यक्षेत्रातील दिग्गज दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री यांनी गावोगावी जाऊन हे शिबिर घेतले. यामुळे अंतिम फेरीतील एकांकिका दर्जेदार झाल्या आणि यातून मागील वर्षी नाट्य परिषद करंडक स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त एकांकिका चिरंजीव परफेक्ट बिघडलाय या एकांकिकेचे व्यावसायिक नाटकात रूपांतर करून व्यावसायिक रंगभूमीवर हे नाटक सादर करण्यात आले आणि नाटकाचे आजअखेर १०० नाट्यप्रयोग झाले असून त्यातील २५ प्रयोग महाराष्ट्रभारतील नाट्य परिषदेच्या शाखांमध्ये सादर करण्यात आले, अशी माहिती अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली.

दरवर्षी ’नाट्य परिषद करंडक’ ह्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे नाट्य परिषदेच्या नियामक मंडळ व कार्यकारी समितीने ठरविले आहे. तसेच १०० व्या नाट्यसंमेलनानिमित्त सुरू करण्यात आलेला ’नाट्यकलेचा जागर’ यातील एकपात्री स्पर्धा, नाट्यअभिवाचन स्पर्धा, नाट्यसंगीत पद गायन प्रवेश स्पर्धा यांचा देखील स्पर्धा महोत्सव घेण्याचा परिषदेचा मानस आहे.

नाट्य परिषद करंडक ही स्पर्धा प्राथमिक, विभागीय व अंतिम फेरी अश्या तीन फेऱ्यांमध्ये होणार आहे. प्राथमिक फेरी सप्टेंबर अखेर विविध केंद्रांवर होऊन यातील निवडक कलाकृतींची विभागीय फेरी तर अंतिम फेरी मुंबई येथे २८ ऑक्टोबर २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, मनमाला टँक रोड, माटुंगा – माहीम, मुंबई येथे होणार आहे. अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांसाठी नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. हे शिबिर नाट्यक्षेत्रातील दिग्गज दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री घेणार असून अंतिम फेरीतील सादरीकरणाचा दर्जा यामुळे सर्वोत्तम असणार आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकांकिका स्पर्धा घेण्याचा नाट्य परिषदेचा मानस आहे. ज्या जिल्ह्यातून किमान १० प्रवेशिका येतील त्याठिकाणी स्पर्धेचे केंद्र देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील सर्व गुणवंत कलाकारांना नाट्यसंमेलनात आपली कला सादर करण्याची संधी या उपक्रमातून मिळणार आहे. तसेच सर्वोत्कृष्ट एकांकिकेका व्यावसायिक रंगभूमीवर व्हावी यासाठी नाट्य परिषद प्रयत्नशील राहणार आहे. या स्पर्धेतील सर्व सहभागी कलावंत, तंत्रज्ञ यांना सहभागपत्र देण्यात येणार आहे. एकांकिकेसाठी प्रवेश फी रु. १००० ठेवण्यात आली आहे. या स्पर्धेची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच होणार असून खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करून एकांकिका स्पर्धेची माहिती, नियमावली www.natyaparishad.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज भरण्याची शेवटची तारीख आणि वेळ १८ सप्टेंबर २०२६ आहे.

स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी मध्यवर्ती, मुंबई ८५९१७०६८८७ या क्रमांकावर संपर्क साधावा. अहिल्यानगर केंद्रासाठी समन्वयक अनंत जोशी ९४२२२२६३६३, प्रशांत जठार यांचेशी संपर्क साधावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी, कलावंतांनी, महाविद्यालय, हौशी संस्था, विद्यापीठाच्या व इतर महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आव्हान नाट्य परिषद मध्यवर्ती, मुंबई कोषाध्यक्ष सतीश लोटके, नियामक मंडळ सदस्य क्षितिज झावरे, संजयकुमार दळवी व अहिल्या नगर शाखेचे अध्यक्ष अमोल खोले, उपनगर शाखेचे प्रसाद बेडेकर यांनी केले.

## राहुल गांधी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – महाजनगल्लीतील गायत्री प्रसाद निवास अपार्टमेंट मधील रहिवासी राहुल अशोक गांधी (वय ४५) यांचे ५ सप्टेबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. चैनसुख, प्रेमसुख, प्रमोद गांधी यांचे पुतणे, प्रशांत, पवन, आनंद, रोहित, मोहित, पराग यांचे ते बंधू तर राशी व आयुष यांचे ते वडील होत. गांधी हे दिवंगत स्वातंत्र्य सैनिक डॉ. भी. मु. बोरा यांचे नातू व मनीष व डॉ. जीनेश बोरा यांचे बंधू होत.

## श्रीमती कौशल्याबाई टाक यांचे निधन



नगर – केडगाव येथील रहिवासी श्रीमती कौशल्याबाई शंकरराव टाक (वय ८०) यांचे ५ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. राजेंद्र टाक यांच्या त्या मातोश्री होत. त्या धार्मिक वृत्तीच्या व मनमिळावू स्वभावाच्या होत्या.

## मनिष लढ्ढा यांचे दु:खद निधन




नगर – क्रांतीवीर चौक, वंजारगल्ली कॉर्नर येथील रहिवासी मनिष (पापालाल) छोटालाल लढ्ढा (वय ५४) यांचे ५ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, भाऊ, पत्नी, बहीण, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे. छोटालाल यांचे चिरंजीव, धिरज लढ्ढा यांचे बंधू, सिद्धेश यांचे ते वडील होत.

## बाळासाहेब चोभे यांचे दु:खद निधन



नगर – बाबुर्डी बेंद येथील रहिवासी बाळासाहेब सर्जेराव चोभे (वय ५४) यांचे ४ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, भाऊ, पत्नी, भावजय, पुतणे, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## लक्ष्मण कुलट यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – खातगाव टाकळी (ता.नगर) येथील रहिवासी आणि सेवानिवृत्त सहायक पोलिस उपनिरीक्षक लक्ष्मण तुकाराम कुलट (वय ९३) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले आणि एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कान्हूर पठार पतसंस्थेचे लेखापरीक्षक विजयराव कुलट यांचे ते वडील होत.

# महागाईविरोधात महिला रस्त्यावर; जिल्हाधिकारी कार्यालयावर नेला मोर्चा

**जीवनावश्यक वस्तू, गॅस व इंधनाचे दर कमी करण्याची मागणी; केंद्र-राज्य सरकारच्या धोरणांचा निषेध**



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करताना राष्ट्रवादी (श.प.) पक्षाच्या महिला.

नगर – केंद्र व राज्य सरकारच्या महागाईविरोधी धोरणांचा निषेध करत राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी महागाई नियंत्रणासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, सर्वसामान्य नागरिक, महिला गृहिणी, शेतकरी, कामगार तसेच मध्यमवर्गीय कुटुंबे वाढत्या महागाईच्या तडाख्याने त्रस्त झाली आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, घरगुती खर्चातील वाढ आणि उत्पन्नाच्या तुलनेत वाढणारा खर्च यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. महागाईचा सर्वाधिक परिणाम घर चालविणाऱ्या महिलांवर होत असून स्वयंपाकघराचे बजेट सांभाळताना महिलांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाने केवळ आश्वासने न देता महागाई नियंत्रणासाठी ठोस आणि तातडीची पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. साखर, खाद्यतेल, डाळी, धान्य, भाजीपाला यांसह जीवनावश्यक वस्तूंचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणावेत, घरगुती गॅसच्या दरात मोठी कपात करावी, तसेच पेट्रोल व डिझेलवरील कर कमी करून इंधनाचे दर कमी करावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी प्रभावी आर्थिक मदत व सवलती जाहीर कराव्यात, काळाबाजार, साठेबाजी व कृत्रिम दरवाढ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्याचा दर्जा व वितरण व्यवस्था अधिक सक्षम करावी, अशी मागणीही करण्यात आली.


महिलांवरील वाढता आर्थिक भार लक्षात घेऊन महिला केंद्रित महागाई नियंत्रणाच्या उपाययोजना राबवाव्यात. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव आणि ग्राहकांना वाजवी दरात वस्तू मिळतील, अशी प्रभावी बाजारव्यवस्था निर्माण करावी. केंद्र व राज्य सरकारने महागाई नियंत्रणासाठी तातडीने ठोस कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली. महागाईच्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष न दिल्यास सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी यापेक्षाही तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला. यावेळी महिला शहराध्यक्ष अर्चना गायकवाड, उपाध्यक्ष वेणूबाई वाणी, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष अथर खान, जिल्हा कार्याध्यक्ष समीर पठाण, शहर कार्याध्यक्ष अजहर शेख, जिल्हा उपाध्यक्ष मतीन शेख, वर्षा सगळगिरे, अलका वाकडे, अर्चना रत्नपारखे, अर्चना शिंदे, गायत्री गायकवाड, कोमल मस्के, सायरा सय्यद, रशीदा शेख, जायदा मिर्झा आदींसह पदाधिकारी व महिला उपस्थित होत्या.

## मयुरेश आडेप यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सुडके मळा, बालिकाश्रम रोड येथील रहिवासी अभियंता मयुरेश सिद्धेश्वर आडेप (वय ४६) यांचे ४ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, २ बहिणी, पत्नी, १ मुलगा असा परिवार आहे.

## शिवाजी बोरुडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – बालिकाश्रम रोड, बोरुडे मळा येथील रहिवासी शिवाजी मनाजी बोरुडे (वय ७५) यांचे ५ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, १ भाऊ, भावजय, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. मच्छिंद्र व किरण बोरुडे यांचे ते वडील होत. पत्रकार किरण बोरुडे यांचे ते चुलत भाऊ होत.

## रेणुकाबाई सब्बन यांचे अल्प आजाराने निधन



नगर – दातरंगे मळा वारुळाचा मारुती रोड येथील रहिवासी श्रीमती रेणुकाबाई दत्तात्रय सब्बन (वय ६१) यांचे ५ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे सासु, २ मुले, १ मुलगी, २ दिर, ४ जावा, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कल्याण रोड शिवाजीनगर येथील हनुमान पान सेंटरचे संतोष सब्बन व राहुल सब्बन यांच्या त्या आई होत.

# डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानाच्या सहाव्या आठवड्यात रेल्वे स्टेशन परिसरात जनजागृती


रेल्वे स्टेशन परिसरात डेंग्यूबाबत जनजागृतीपर कार्यक्रमात बोलताना आयुक्त यशवंड डांगे.

नगर – पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर साथीचे आजार पसरण्याची शक्यता असताना अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने डेंग्यूमुक्त अहिल्यानगर साप्ताहिक उपक्रमांतर्गत सहाव्या आठवड्यानिमित्त रेल्वे स्टेशन परिसरात घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी तसेच डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्यात आली.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधत डेंग्यू आजाराची कारणे, घ्यावयाची काळजी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत माहिती जाणून घेतली.

आयुक्त डांगे म्हणाले, अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाने आरोग्य सेवांच्या बाबतीत चांगले काम केल्यामुळे राज्यातील महापालिका क्षेत्रांमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. या कामामध्ये सातत्य टिकवून ठेवणे गरजेचे आहे. महापालिकेच्या आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना विविध आरोग्य सुविधा तसेच औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. नागरिकांनी या सुविधांचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा. पावसाळ्यामध्ये साथीचे आजार मोठ्या प्रमाणात पसरण्याची शक्यता असते. हे आजार रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून आणि परिसरापासून स्वच्छतेला सुरुवात करावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शहरात डेंग्यू आजाराबाबत चांगल्या पद्धतीने जनजागृती होत असून, त्यामुळे रुग्णसंख्येत घट झाल्याचे दिसून येत आहे. नागरिकांचे आरोग्य सदृढ आणि निरोगी राहावे यासाठी महापालिका प्रशासन काम करत असून, नागरिकांच्या घरापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

रेल्वे स्टेशन परिसरात झालेल्या या उपक्रमावेळी आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेवक मनोज कोतकर, दत्ता गाडळकर, मयूर बांगरे, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, शिक्षणाधिकारी जुबेर पठाण, मुख्याध्यापक विजय हिंगे, डॉक्टर एच. आर. मुजुमदार, प्रशांत जाधव, वृषाली आरु, विनय शेळके, प्रभाग अधिकारी सतीश पुंड, योगेश औटी आदींसह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेवक मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे डेंग्यूबाबत उपाययोजना आणि घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी डेंग्यू आजाराबाबत पथनाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. डेंग्यू प्रतिबंधासाठी स्वच्छता, पाणीसाठे टाळणे आणि नागरिकांनी घ्यावयाच्या काळजीबाबत विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे जनजागृती केली.

# गृहिणी

## आरोग्य

### पाणी उकळून का प्यावे?

आजच्या धावपळीच्या जीवनात आपण आरोग्याकडे दुर्लक्ष करतो आणि त्याची सुरुवात पाण्यापासूनच होते. आपल्या घरात नळाद्वारे येणारे पाणी हे अनेक ठिकाणांहून प्रवास करून येते आणि या प्रवासात त्यात धूळ, माती आणि असंख्य अदृश्य जंतू मिसळले असतात. हे पाणी डोळ्यांना जरी स्वच्छ दिसले तरी त्यात टायफॉइड, कॉलरा, कावीळ आणि अतिसारासारखे आजार निर्माण करणारे विषाणू जिवंत असतात. अशा पाण्याला जर आपण शंभर अंश सेल्सिअस पर्यंत उकळले तर त्यातील सर्व हानिकारक जिवाणू काही मिनिटांतच नष्ट होतात आणि पाणी पिण्यायोग्य बनते.पूर्वीच्या काळी आपल्या आजी-आजोबा पाणी उकळूनच पित असत आणि त्यामुळेच ते जास्त निरोगी राहत असत. उकळलेले पाणी हे फक्त जंतूंपासूनच वाचवत नाही तर आपली पचनशक्ती देखील वाढवते. सकाळी कोमट उकळलेले पाणी प्यायल्याने पोट साफ होते, गॅस आणि ॲसिडिटीची समस्या कमी होते आणि शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर टाकले जातात. याउलट फिल्टरचे पाणी हे विजेवर अवलंबून असते आणि फिल्टर वेळेवर न बदलल्यास तेच पाणी अधिक घातक बनू शकते. पाणी उकळणे हा सर्वात स्वस्त, सोपा आणि शंभर टक्के खात्रीचा उपाय आहे. त्यामुळे पाणी नेहमी चांगले उकळून, दोन ते तीन मिनिटे उकळी येऊ देऊन, नंतर ते स्वच्छ कपड्याने गाळून स्टील किंवा काचेच्या भांड्यात भरून ठेवावे आणि दिवसभर तेच पाणी प्यावे. ही एक छोटी सवय आपल्याला मोठ्या आजारांपासून आणि खर्चापासून सहज वाचवू शकते.

## पाककला

### राजभोग श्रीखंड

**साहित्य :** घट्ट चक्का २ वाट्या, पिठी साखर १ वाटी, छोटा राजभोग ८ ते १०, केशर १/२ चमचा, कोमट दूध ३ चमचे, वेलची पावडर १/२ चमचा, काजूचे बारीक तुकडे १ चमचा, बारीक चिरलेले पिस्ते १ चमचा, बारीक चिरलेले बदाम १ चमचा, सजावटीसाठी सुक्या गुलाबाच्या पाकळ्या १ चमचा, गुलाब पाणी १/२ चमचा

**कृती :** प्रथम एका छोट्या वाटीत कोमट दूध घेऊन त्यात केशराच्या काड्या १५ मिनिटे भिजत ठेवा म्हणजे त्याचा रंग आणि स्वाद चांगला उतरेल. एका मोठ्या परातीत घट्ट चक्का घ्या आणि तो रवीने किंवा हँड ब्लेंडरने ५ मिनिटे चांगला फेटून घ्या जेणेकरून तो एकदम मऊ आणि क्रीमी होईल. आता त्यात थोडी थोडी पिठी साखर घालत फेटत राहा, गुठळी अजिबात राहू देऊ नका. त्यात तयार केशराचे दूध, वेलची पावडर आणि गुलाब पाणी घालून मिश्रण पुन्हा एकजीव करा. राजभोगचे दोन भाग करून त्याचे मध्यम तुकडे करा. आता फेटलेल्या श्रीखंडात राजभोगचे तुकडे, काजू, बदाम आणि पिस्त्याचे काप घाला आणि हलक्या हाताने चमच्याने मिक्स करा, जास्त जोरात फेटू नका नाहीतर राजभोग तुटेल. तयार श्रीखंड एका काचेच्या बाऊलमध्ये काढून झाकण लावून फ्रीजमध्ये किमान २ तास थंड होण्यासाठी ठेवा म्हणजे सर्व स्वाद एकमेकांत मुरतील. सर्व्ह करताना वरून सुक्या गुलाब पाकळ्या, पिस्ते आणि एक अख्खा राजभोग ठेवून थंडगार सर्व्ह करा.

## वास्तू

### स्वयंपाकघरात टाळा काळ्या रंगाचा वापर

* स्वयंपाकघर हे अग्नी तत्वाचे स्थान आहे. काळा रंग हा शनीचा आणि नकारात्मकतेचा मानला जातो. अग्नी आणि शनी यांच्यात विरोध असल्याने घरात वाद-विवाद वाढतात.

* काळा रंग हा जडत्वाचा प्रतीक आहे. यामुळे अन्न वाया जाणे, खर्च वाढणे आणि आर्थिक अडचणी येतात असे मानले जाते.

## सौंदर्य

रात्री झोपण्यापूर्वी चेहरा स्वच्छ धुऊन ५ ते ७ मिनिटे मसाज करा. आठवड्यातून ४ वेळा केल्यास १ महिन्यात फरक दिसेल. बदाम तेल, खोबरेल तेल किंवा एलोवेरा जेल मसाजसाठी उत्तम. कोरड्या त्वचेसाठी बदाम तेल वापरा.

## सल्ला

पोहे झाल्यावर कधीही झाकण ठेवू नका. झाकण ठेवल्याने वाफ धरून पोहे चिकट आणि मऊ होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६**

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, आर्द्रा १९।५३, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** दिवस धावपळीचा जाईल, अचानक धनलाभ होईल.

**वृषभ :** कामात अडथळे येतील, संध्याकाळी चांगली बातमी मिळेल.

**मिथुन :** जुन्या मित्राची भेट होईल, प्रवास योग आहे.

**कर्क :** घरात आनंदाचे वातावरण राहील, खर्च वाढेल.

**सिंह :** नोकरीत बढतीचे योग आहेत, मान-सन्मान वाढेल.

**कन्या :** आरोग्याची काळजी घ्यावी लागेल, पैशांची आवक होईल.

**तूळ :** नवीन कामाची सुरुवात होईल, प्रेमात यश मिळेल.

**वृश्चिक :** शत्रूंपासून सावध राहावे लागेल, काम पूर्ण होईल.

**धनु :** भाग्याची साथ मिळेल, धार्मिक कार्य घडेल.

**मकर :** व्यवसायात फायदा होईल, कुटुंबासोबत वेळ जाईल.

**कुंभ :** मनातील इच्छा पूर्ण होईल, प्रवासात लाभ.

**मीन :** दिवस संमिश्र जाईल, वादविवाद टाळावेत.

## शब्दगंध क्र. ७५१० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | | ४ | ५ | ■ |
| ६ | | | ■ | ■ | ७ | | |
| ८ | | ■ | ९ | १० | | | ■ |
| | ■ | ११ | | | ■ | १२ | १३ |
| १४ | १५ | | ■ | १६ | १७ | ■ | |
| ■ | | ■ | ■ | १८ | | १९ | |
| २० | | २१ | | ■ | २२ | | ■ |
| २३ | | | ■ | २४ | | | |

**आडवे शब्द :-** १) एक म्हण - ++ ++++ + पगडी पचास ६) लाल तोंडाचा शेपूट असलेला एक प्राणी ७) शाबासकी; तारीफ; प्रशंसा ८) अयोध्येचा राजा; सीतापती ९) ज्याचे नाव खराब झाले आहे असा; दुर्लौकिक प्राप्त झालेला ११) तांबडी फुले येणारा एक वृक्ष १२) भाकरी, पोळी वगैरे ज्यावर भाजतात ते गोल उथळ पात्र १४) अप्रीती; आवड नसणे १६) फळ किंवा उसातील द्रव १८) मरगळ; ग्लानी; शीण २०) अंधार; काळोख २२) रड; रडगाणे २३) भयंकर २४) विविध सणांचे दिवस

**उभे शब्द :-** १) ब्राह्मणभोजन; भंडारा २) विशिष्ट द्रव्यसंख्या; अमाउंट ३) गायीम्हशीचे आचळ; एक वृक्ष ४) ताजा; नव्या दमाचा ५) बला; संकट; आपत्ती; विपदा ९) संकट; अरिष्ट १०) श्रीरामाच्या वडिलांचे नाव ११) झाडावरून खाली पडलेले फळ १३) खोडकर; व्रात्य १५) पृथ्वी; धरती; रसा १७) कारणासहित १९) रतीब; उकाडा २०) आकडा; मांडी २१) आजच्या आदला दिवस

### शब्दगंध क्र. ७५०९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| का | सा | वि | स | ■ | सं | प | दा |
| ट | ■ | स | व | ल | त | ■ | णा |
| क | स | र | त | ■ | त | गा | दा |
| ■ | ■ | भो | ■ | सा | धा | र | ण |
| ब | ग | ळा | ■ | ग | र | ■ | ■ |
| न | ड | ■ | मो | र | ■ | स | वा |
| क | ब | र | ■ | गो | लं | दा | ज |
| र | ड | वा | ■ | टा | का | ■ | वी |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** आयुष्यात दुसऱ्याला दोष देणे सोपे आहे, पण स्वतःला सुधारणे कठीण आहे, आणि जो स्वतःला सुधारतो तोच खरा मोठा होतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### डायनासोर इतके मोठे होते तरी ते नष्ट कसे झाले?

अनेक कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर डायनासोरचे राज्य होते. काही डायनासोर इतके मोठे होते की त्यांची उंची चार मजली इमारती एवढी होती आणि वजन २० हत्तींएवढे होते. त्यांना हरवू शकेल असा कोणताच प्राणी नव्हता. मग असे बलाढ्य प्राणी अचानक कसे नष्ट झाले, हा प्रश्न सर्वांनाच पडतो. शास्त्रज्ञ सांगतात की आजपासून सुमारे साडेसहा कोटी वर्षांपूर्वी आकाशातून एक खूप मोठा दगड म्हणजे उल्का वेगाने पृथ्वीवर येऊन आदळली. ही उल्का जवळजवळ १० किलोमीटर मोठी होती. ती मेक्सिको जवळील समुद्रात पडली. तिच्या आदळण्याने एवढा मोठा स्फोट झाला की हजारो अणुबॉम्ब एकत्र फुटल्यासारखा आवाज आला.या स्फोटामुळे पृथ्वीवर सगळीकडे धूळ आणि राख पसरली. त्यामुळे अनेक महिने सूर्याचा प्रकाशच पृथ्वीवर पोहोचला नाही. सूर्यप्रकाश नसल्यामुळे झाडे सुकून गेली. झाडे नसल्यामुळे शाकाहारी डायनासोरना खायला काहीच मिळाले नाही आणि ते मरू लागले. शाकाहारी डायनासोर मेले म्हणून मांसाहारी डायनासोरनाही अन्न मिळेनासे झाले. त्याच वेळी पृथ्वीवर मोठमोठे ज्वालामुखी फुटले होते. त्यातून निघणाऱ्या विषारी वायूमुळे हवा खराब झाली आणि पृथ्वी खूप गरम झाली. थंडी, गरमी, उपासमार आणि अंधार यामुळे बलाढ्य डायनासोर या संकटातून वाचू शकले नाहीत आणि हळूहळू पृथ्वीवरून नाहीसे झाले. मात्र याच काळात उंदरा एवढे छोटे सस्तन प्राणी बिळात लपून राहिले आणि वाचले. पुढे त्यांच्यापासूनच माणसाचा जन्म झाला. म्हणजे जर डायनासोर नष्ट झाले नसते तर कदाचित आज आपण इथे नसलो असतो.

### कोळी आणि राजा

एका देशात एक पराक्रमी राजा होता. तो खूप शूर होता, पण एका लढाईत त्याचा पराभव झाला. शत्रूचे सैन्य मोठे होते. राजाचे सर्व सैनिक पळून गेले. राजा एकटाच जीव वाचवण्यासाठी एका गुहेत लपून बसला. राजा खूप निराश झाला होता. तो मनात म्हणाला, आता सर्व संपले, मी पुन्हा कधीच जिंकू शकणार नाही. तेवढ्यात त्याचे लक्ष गुहेच्या कोपऱ्यात गेले. तिथे एक छोटा कोळी आपले जाळे बनवत होता. कोळी वर चढायचा आणि खाली पडायचा. जाळे तुटायचे. राजाने पाहिले, कोळी एकदा नाही, दोनदा नाही, तर सहा वेळा खाली पडला. पण सातव्या वेळी कोळ्याने हार मानली नाही. त्याने पुन्हा प्रयत्न केला आणि यावेळी तो वर पोहोचला आणि त्याने सुंदर जाळे पूर्ण केले. हे पाहून राजाला धक्काच बसला. तो विचार करू लागला, हा एवढासा कोळी सहा वेळा पडूनही प्रयत्न सोडत नाही, तर मी तर राजा आहे. मी एका पराभवाने का हार मानू? राजाला नवी उमेद मिळाली. तो गुहेतून बाहेर पडला. त्याने विखुरलेल्या सैनिकांना पुन्हा एकत्र केले आणि नव्या जोशाने लढाई केली. या वेळी तो जिंकला आणि त्याने आपले राज्य परत मिळवले.

तात्पर्य : अपयश आले म्हणून खचून जाऊ नये. जो सतत प्रयत्न करतो, त्याला यश नक्की मिळते.

## आत्मशक्ति



### विद्या आम्हाला कोण शिकवितो?

लक्ष बाह्य जगाकडे देण्याची सवयआमची दृष्टी बाहेरील जग आणि जडवस्तूंपर्यंतच सिमीत असते. अगदी जन्मापासून बाहेरच्या जगाकडे लक्ष देण्याचे आम्हाला शिकविले जाते. अंतरी जाण्याची विद्या आम्हाला कोण शिकवितो? आठवते का कधीतरी आमच्या आईवडिलांनी अथवा शिक्षकांनी आमचे लक्ष अंतरी वेधले आहे? आम्ही वाढत असताना आमच्या ध्यानाला ही नवी दिशा कोणी दाखविली का? जर नसेल तर आमचे ध्यान मनाच्या कलाने चालेल व त्याची दृष्टी बाह्य जगापुरतीच मर्यादित राहील. मग आमचे वय कितीही असो, आयुष्यभर आम्ही बाहेरच पाहत राहू. वाढत्या वयाबरोबर बाहेर ध्यान, लक्ष देण्याची सवय पक्की होत जाते.

आपले दैनंदिन जीवन डोळ्यांपुढे आणा. सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत ह्या जगाच्या कामात आम्ही व्यग्र असतो. आमच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या असतात. त्याकडे आम्हाला लक्ष द्यावे लागते. वर्तमानपत्रातील बातम्या आमचे लक्ष वेधून घेत असतात. काही लोक दूरध्वनी वा दूरदर्शनद्वारा बातम्या, दळणवळण आणि हवामान ह्याबाबतची माहिती घेत असतात. (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### ते रागवले तर...

दुःख होण्याचं सगळ्यात मोठं कारण कोणतं असं त्यांना विचारलं. सगळ्यांनी दिलेल्या उत्तरांमध्ये, जेव्हा पालक त्यांना रागावले आणि शिक्षा केली तेव्हा ते सर्वात जास्त दुखावले गेले, हे उत्तर आलं. हे ऐकल्यानंतर अनेक पालकांना जाणीव झाली की त्यांच्या कृतीमुळे मुलं दुखावली गेली आणि त्यांचे डोळे पाणावले. पालकांना असं वाटतं की ते मुलांच्या भल्यासाठी त्यांना रागवतात. त्यांचा हेतू शुद्ध आहे पण मुलांना कोणत्या प्रकारची ऊर्जा मिळतीय?

सुरेश ओबेरॉय : मी माझ्या मुलांवर, त्यांच्या मित्रांसमोर हात उचलला आहे.

शिवानीदीदी : आपल्याला फक्त स्वतःला त्यांच्या जागी ठेवून बघायचं आहे. जर आपण आपल्या मित्रांबरोबर आहोत आणि आपल्या आयुष्यातील एखाद्या मोठ्या माणसाने आपल्याला असं वागवलं तर आपल्याला कसं वाटेल?

सुरेश ओबेरॉय : अशा जखमा भरून यायला वेळ लागतो.

शिवानीदीदी : अशा जखमा भरून येणं फार अवघड आहे. एखादं मूल मोठं झाल्यावरही ते दुःख विसरणं त्याला जमणार नाही. कारण मूल संस्कारक्षम वयात असताना ते दुःख इतर कोणी नाही तर त्याच्या पालकांनी दिलेलं असतं.लहान मुलांसाठी आईवडील म्हणजे त्यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाच्या, आदर्श आणि देवासमान अशा व्यक्ती. किमान मुलं मोठी होईपर्यंत तरी नक्कीच.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आई : अरे विनू मोबाईल मध्ये बॅलन्स कसा चेक करतात रे?

विनू : #१२१ दाब.

आईने डायल केलं आणि म्हणाली : हॅलो, बॅलन्स आहे का?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* नोबेल पारितोषिक कोणत्या देशातून दिले जाते?

– स्वीडन (शांततेचे नोबेल नॉर्वे मधून)

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास - परिक्षा

परिक्षा हा शब्द उच्चारला की मोठ्यांना शालेय, महाविद्यालयीन जीवनाची आठवण येते. अभ्यास करणं, परिक्षेला जाणं, प्रश्नपत्रिका, उत्तरं लिहिणं, रिकाम्या जागा भरा, जोड्या जुळवा, संदर्भासह स्पष्टीकरण लिहा, कारणे लिहा, एका वाक्यात उत्तर लिहा. ह्यासह आणखीही बरच काही आठवतं. परिक्षा हॉल, आलेले परिक्षक कसे आहात ?, वर्गातली शांतता, विद्यार्थी उत्तरं लिहिताहेत, काहींच्या चेहऱ्यावर आनंद तर काहींच्या चेहऱ्यावर दुःख... आणखीही बरचसं आठवतं.

काही दिवसांनी उत्तरपत्रिका, शिक्षक वर्गात घेऊन येतात. तेव्हा पुन्हा परिक्षेचा दिवस आठवतो. परिक्षा हा शब्द उच्चारला की काही विद्यार्थी घाबरायचे. परिक्षा नसावी असं त्यांना वाटायचं तर जे विद्यार्थी नियमित अभ्यास करतात त्यांना परिक्षा असावीच असं वाटायचं. आज लक्षात येतं परिक्षा म्हणजे काही दिवसाकरिता शिकणं थांबवणं पण ह्याआधी जे शिकलो ते कितपत समजलं हे पाहण्यासाठी परिक्षा. हे समजणं म्हणजेच अभ्यास करणं आलं. म्हणजेच मनाची एकाग्रता अभ्यास करण्यासाठी गरजेची आहे. किती समजलं, लक्षात राहिलं हे पाहण्यासाठी परिक्षा म्हणजे मेंदुचा व्यायाम, मेंदुच्या स्मरणशक्तीची परिक्षा.

अभ्यास म्हणजेच त्या विषयाशी एकरूप होणं, तो तो विषय शिकवतांना शिक्षकांनी कोणतं उदाहरण दिलं होतं ते आठवणं. अभ्यास करणं म्हणजेच शांततेची आवड निर्माण करणं. स्पेलींग पाठ करणं, सुत्रं पाठ करणं, गणिताच्या उत्तराच्या पायऱ्या लक्षात ठेवणं. पाढे पाठ करणं, विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी प्रयोग करतांना केलेली कृती, निरिक्षण लिहिणं- लक्षात ठेवणं. शिकत असतांनाच कितपत समजलं. कितपत समजणं बाकी आहे हे पाहण्याचं माध्यम म्हणजे परिक्षा. परिक्षेला घाबरुन कसं चालेल? घाबरणं म्हणजेच स्वतःला दुबळं करणं. दुबळं होऊन उत्तरं सापडणार नाहीत. परिक्षा अर्थात एक प्रकारची कसोटी. कसोटीत खरं उतरण्यासाठी चिकाटी, जिद्द, सचोटी महत्वाची आहे. परिक्षा म्हंटलं की पास-नापास अर्थात निकाल हा येतोच. निकाल म्हणजेच आपली शैक्षणिक प्रगती की अधोगती हे समजण्याचं माध्यम. परिक्षा म्हणजेच प्रत्येक विषयाला सारखं महत्व देणं. कारण निकाल हा सगळ्या विषयांचा मिळुन असतो. मराठीत चांगले गुण आहेत आणि इंग्लिश, गणितात कमी गुण असतील तर इंग्लीश आणि गणिताकडे अधिक लक्ष देणं गरजेचं आहे हे लक्षात येतं. परंतु जर परिक्षाच नसतील तर? आपण कोणत्या विषयात कमी आहोत हे लक्षात येणार नाही.

थोडक्यात म्हणता येईल की परिक्षा हा शिक्षणातला अविभाज्य भाग आहे. समजा इयत्ता नववीच्या विद्यार्थ्याला सहामाही परिक्षेत इंग्लीश आणि गणित विषयात पन्नासच्या आत गुण, शंभर गुणांपैकी असतील तर तो विद्यार्थी सहामाही परिक्षेनंतर सदर दोन्हीही विषयांकडे गांभिर्याने लक्ष देणार, गांभिर्याने गणित सोडविण्याचा सराव करणार. इंग्लीश आणि गणित विषयातलं जे जे लक्षात आलं नाही ते ते विचारणार. वार्षिक परिक्षेत इंग्लीश आणि गणित विषयात शंभरपैकी सत्तर गुणांपेक्षाही अधिक मिळवण्याचा प्रयत्न करणार, गुण मिळवणारंच. परिक्षा हे आत्मपरिक्षण करण्यासाठीचं माध्यम आहे.

परिक्षेत उत्तरं दिलेल्या वेळेतच लिहावी लागतात. समजा परिक्षेची वेळ सकाळी अकरा ते दुपारी एक वाजेपर्यंत आहे. पण विद्यार्थी दुपारी बारा वाजता परिक्षेला आला तर चालणार नाही. कारण विद्यार्थ्याने साधारण रिपोर्टिंग टाईमपूर्वी परिक्षा हॉलमध्ये येणं अपेक्षित असतं. परिक्षेत कॉपी करणं हा घातकी मोह आहे. कॉपी करण्याच्या मोहात न अडकता अभ्यास करुनच पास होणार हा सकारात्मक विचार करुन, तशी कृती करणं योग्य आहे. परिक्षा म्हणजेच मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करणं. वक्तशीरपणाची सवय फक्त परिक्षेमुळेच लागते.

वेळेचं अमूल्यत्व परिक्षेमुळंच समजतं. शालेय, महाविद्यालयीन जीवनानंतर अर्थात विद्यार्थी दशेनंतरही प्रत्येकाची परिक्षाच चालुच असते. पण ह्या परिक्षेसाठी उत्तरपत्रिका, पेन, पेन्सिल गरजेची नाही. आजपर्यंतच्या अनुभवावरुन, आजपर्यंतच्या अभ्यासावरुन उत्तरं सोडवावी लागतात. ह्या वयातली परिक्षा, अनपेक्षितही समोर उभी राहाते. त्या विशिष्ठक्षणी आपण अत्यंत शांत राहिलं पाहिजे. उत्तर आणि त्याच्या निकालाचा सर्वांगिण विचार केलाच पाहिजे. ह्यासह घेतलेल्या शिक्षणाचा, चांगल्या-वाईट अनुभवांचा विचार केलाच पाहिजे. उत्तर शोधतांना ह्या गोष्टींचा विचार केलाच पाहिजे. परिक्षेतला प्रत्येक प्रश्न आपण सोडवतं नसतो.

दैनंदिन जीवन जगतांना दररोज परिक्षा असतेच. आपण त्या परिक्षेला सामोरं जातांना उत्तरं सोडवायचीच हा सकारात्मक विचार आणि त्यानुसारची कृतीच आपल्याला यशस्वी करते. परिक्षेला घाबरुन उत्तर कधीच लिहिता येणार नाही. अभ्यास करुन मी अ अधिक श्रेणी मिळवणारच हा ठाम निर्धार आणि त्यानुसारची कृती महत्वाची आहे. प्रश्नपत्रिकेत नेमके कोणते प्रश्न आहेत हे माहित नसतं म्हणून तर अभ्यास हा आपल्याला सुसंस्कारित करत असतो, घडवत असतो. धिटाईने, आत्मविश्वासाने परिक्षेला सामोरे जाऊया, यशस्वी होऊया.

(लेख क्र.६१६)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आहारवेद - आरोग्य संवर्धन

### तिळ

तांबड्या तीळात लोह अधिक प्रमाणात असते. म्हणून लोह कमी असणाऱ्यांनी तांबडे तीळ खावेत. तीळतेल हे सर्वसामान्य तापमानाला थिजत नाही, म्हणून ते आरोग्यास हितकारक आहे.

उपयोग : १) तीळतेल स्निग्ध गुणाचे असल्याने तीळ खाल्ल्याने त्वचा मऊ व स्निग्ध होते.

२) ज्यांचे केस रूक्ष व गळत आहेत, त्यांनी तीळ खावेत. यामध्ये कॅल्शिअमचे प्रमाण भरपूर असल्याने केसगळती थांबून केस मजबूत व लांब होतात. तसेच तीळाच्या स्निग्ध गुणामुळे केस मऊ व मुलायम होतात.

३) सकाळच्या वेळी प्रत्येकाने मूठभर तीळ चावून चावून खावेत. यामुळे शरीरास व मनास ऊर्जा मिळून उत्साह निर्माण होतो. तसेच दात मजबूत होतात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सीएसआरडी आयोजित समाजकार्य महोत्सवामध्ये सामाजिक संस्था, माजी विद्यार्थ्यांच्या कार्याचा गौरव

नगर – राष्ट्रीय समाजकार्य सप्ताह तसेच वेठबिगार प्रथा (निर्मूलन) कायदा, १९७६ च्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त बीपीएचई सोसायटीचे सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, सीएसआरडी माजी विद्यार्थी संघ आणि इंटरनॅशनल जस्टिस मिशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समाजकार्य महोत्सव सावेडीतील माऊली सभागृहात पार पडला. या कार्यक्रमात सामाजिक संस्था व माजी विद्यार्थी यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.


समाजकार्य महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. संजय भट्ट, डॉ. दादासाहेब गीते, दिवाणी न्यायाधीश सचिन शिंदे, डॉ. सुरेश पठारे, गोरख जाधव, सी. व्ही. नांदेडकर, नीलिमा बंडेलू आदी.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नॅशनल असोसिएशन ऑफ प्रोफेशनल सोशल वर्कर्स इन इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय भट्ट होते. प्रमुख अतिथी म्हणून अहिल्यानगरचे निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. दादासाहेब गीते तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे प्रभारी सचिव तथा दिवाणी न्यायाधीश सचिन शिंदे उपस्थित होते. यावेळी सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, इंटरनॅशनल जस्टिस मिशनचे गोरख जाधव, सीएसआरडी माजी विद्यार्थी संघाचे सचिव सी. व्ही. नांदेडकर, सदस्या नीलिमा बंडेलू आदी उपस्थित होते. यावेळी समाजातील विविध प्रश्नांवर सातत्याने कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांचा त्यांच्या योगदानाबद्दल सन्मान करण्यात आला. यामध्ये बॉस्को ग्रामीण विकास केंद्र, सोशल सेंटर, वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट, पोलीस अधीक्षक कार्यालायचे भरोसा सेल, न्यायाधार, नवजीवन ग्रामोदय प्रतिष्ठान, ग्रामीण विकास केंद्र जामखेड, अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ, स्नेहालय, इव्हेंजीलीन बूथ हॉस्पिटल, सावली, स्वास्थ्य दर्पण संस्था, युवान, अल्कोहोलिक्स अॅकनॉनिमस, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन, सेवाप्रीत सोशल फाउंडेशन आणि आयडियल हेल्पिंग हँड मिशन यांचा समावेश होता. या संस्थांनी गरिबी निर्मूलन, महिला सक्षमीकरण, जलसंधारण, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, बालसंरक्षण, मानवाधिकार, कायदेविषयक जनजागृती, शिक्षण, आरोग्य, व्यसनमुक्ती, रोजगार, पुनर्वसन, युवक विकास, सामाजिक समता आणि वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याची यावेळी दखल घेण्यात आली.

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सीएसआरडीचे माजी विद्यार्थी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ब्र. लेक्स गोंसाल्विस, ऐक्य सेवा सेंटरचे संस्थापक तुकाराम वाखारे, दिव्यांग क्षेत्रात कार्य करणारे संजय बन्सी साळवे आणि शब्दगंध साहित्य परिषदेचे ग्रामीण लेखक व साहित्यिकांना प्रोत्साहन देणारे सुनील गोसावी यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात इंटरनॅशनल जस्टिस मिशनच्या माध्यमातून वेठबिगारांच्या अन्यायाविरुद्ध सुरू असलेल्या कार्यावर आधारित लघुपट दाखविण्यात आला. दिवाणी न्यायाधीश सचिन शिंदे यांनी वेठबिगार निर्मूलन कायद्याबाबत व्यापक जनजागृती, कायदेविषयक सल्ला आणि पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी सामाजिक संस्था व प्रशासनाच्या समन्वयाची गरज अधोरेखित केली. निवासी जिल्हाधिकारीदादासाहेब गीते यांनी सीएसआरडीच्या सामाजिक, शैक्षणिक आणि ग्रामीण विकास क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय भट्ट यांनी सामाजिक संस्थांनी आपले कार्य अधिक जोमाने सुरू ठेवून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देण्याचे आवाहन केले. सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाच्या सांगतेनंतर आरव्ही ग्रुपचे राहुल पाटोळे प्रस्तुत सुमधुर गीते सादर करण्यात आली. इंडियन आयडॉल फेम गायक अभिषेक नलावडे, सारेगमप फेम गायिका ब्रह्मानंदा पाटणकर, सेलिब्रिटी अँकर व गायक संदीप पाटील यांच्या सादरीकरणाचा उपस्थितांनी मनमुराद आनंद लुटला.

सूत्रसंचालन डॉ. आसावरी झपके व शिवानी शिंगवी यांनी केले. नीलिमा बंडेलू यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जेमोन वर्धीस, डॉ. विजय संसारे, डॉ. प्रदीप जारे, वैशाली पठारे, सॅम्युअल वाघमारे, ट्विंकल ईश्वरी, नाजिम बागवान आदींनी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## निखळ प्रेम ही मोठी शक्ती

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स




तो माझी अडलेली कामे मार्गी लावतो. मला त्यामुळे खूप फायदा होतो. मग ती त्याला दिवाळीला मोठमोठ्याह वस्तू सप्रेम भेट देतो. तो माझा जीवलग मित्र होतो. आमची ही संगत खूप जुनी. पण आद्य शंकराचार्यांच्या मते अशाला काय म्हणायचे, मित्र ? छे मिधा। कारण मैत्री म्हणजे सत्संग.

खरी मैत्री निरपेक्षा मित्रांनी मिळून जनहिताकडे द्यायचे लक्ष. लोभ हा वैयक्तिक लाभासाठी नसावा. स्वार्थ साधण्यासाठी का सहवास वाढवावा ? मैत्री निर्हेतुक व निरुद्देश असली, की मित्राकडून फायदा उकळण्याचा मोह होत नाही. चांगल्या विचारांचे आदानप्रदान, एवढेच त्या मैत्रीत भान. एकमेकांच्या सुखदुः खात सहजच सहभागी होणे, परस्परांच्या सुखदुः खाने सुखावणे वा कष्टी होणे यावरुनच मैत्री जाणवणे, मग असा कुठल्याही मोत्याने जोडलेला, मैत्रीचा संबंध, मनाला देतो शांती व समाधान. न प्रत्युपकारांची भावना, न देण्याघेण्याची साधना, मग मैत्रीत संबंध, मनाला देतो शांती व समाधान न प्रत्युपकारांची भावना, न देण्याघेण्याची साधना, मग मैत्रीत नांदतो खूप मोकळेपणा न ठरतो मग ताण वा तणाव. निरपेक्ष मैत्री हीच जीवनमुक्तीची युक्ती. निखळ प्रेम परस्परांत. ही केवढी मोठी शक्ती तू माझ्यासाठी काही केलेस प्रेमापोटी. तेव्हा त्याची परतफेड करणे लागलेच माझ्या पाठी, असली ठरणारच नाही सक्ती. मैत्री म्हणजे जबरदस्तीने आगतुक यात्री एकत्र येणे नव्हे. घेण्यादेण्याची मैत्री ही तर केवळ बनियेगिरी ती सदा खिशाला लावते कात्री. मैत्री म्हण सत्संग, तेथे केवळ काम, क्रोध यांच्या त्यागाचा आनंद.

मैत्रीमध्ये उत्तम गुणांचाच सदा आविष्कार व्हावा. मित्रांनो नेहमी चांगले वागावे. स्वार्थनिरेक्षपणे मग मित्र व्हावे त्यातून जगाचे कल्याण साधावे, चांगला स्वभाव व चांगले चारित्र्य पाहून मैत्री करावी. नेहमी त्याच्या संगीत राहताना, कुठलाही उद्देश मनात नसावा. आपले काम साधण्याचा मोह किंवा घातकी कपट यांना वाव न द्यावा.

दोन चोर, दोन लबाड तेही एकत्र येउन मिळवतात घबाड. त्यांना कुठली मैत्रीची चाड? एक चोर एकदा एका रेल्वेगाडीत शिरला. रात्री प्रवासी झोपलेले त्याने एकाच्या खिशातून पैसे चोरले. शेजारच्याच बाकावर अंग टाकले. थोड्या वेळाने त्याला एका शिपायाने जारी केले. शिपायाने त्याची बॅग पाहिली. बॅगेत पैशाचे पाकीट मिळाले. त्याने पाकिटाच्या मालकाला हाक मारली. हे घ्या तुमचे पाकीट यात तुमचा फोटोही आहे. पाकिटाच्या मालकाने आतले पैसे मोजले आणि यातल्या नोटा या चोरानं कुठं तरी लपविल्या. म्हणून म्हटले, शिपायाने चोराची झडती घेतली. खिशात नोटाची पुडकी सापडली. तीही त्या शिपायाने पाकिटाच्या मालकाला दिली. चोर खूप चिडला. पाकिटाचा मालक त्याचा पूर्वी मित्र होता. तो चोर चोरी करुन बाकावर लवंडला तेव्हाच त्याने त्याच्या बॅगेत आपले पाकीट टाकले होते व शिपायाला बोलावून आणले होते. पूर्वी दोघे मिळून चोरी करायचे, दोघांनाही ज्ञान एकमेकांच्या डावपेचांचे. शिपाई दोघांचाही मित्र पाकिटावाल्याला त्याने करुन दिली कमाई. त्याच्या मोबदल्यात मिळाल्या काही नोटा चोराला नाही घातल्या हातकड्या, पण त्यासाठी काही दक्षणा काढ राड्या, म्हणून पुन्हा घेतल्या काही नोटा. मैत्रीचा नफा तोटा.

– **किशोर गांधी**


मुख्याध्यापक बी. आर. उंडे यांचा सत्कार करताना अॅड. पांडुरंग गायकवाड. समवेत नानाभाऊ भांबरे, बबन पुंडे, किसन मुंढे, पोलीस उपनिरीक्षक बाबाजी जगताप आदी.

# मुख्याध्यापक बी. आर. उंडे यांच्या नियुक्तीला मान्यता

नगर – पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील जय मल्हार विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक बी. आर. उंडे यांना ३१ ऑगस्ट रोजी नियमित मुख्याध्यापक पदाची मान्यता मिळाल्याबद्दल संस्थेच्या वतीने ४ सप्टेंबर रोजी सचिव अॅड. पांडुरंग गायकवाड यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नानाभाऊ भांबरे, बबन पुंडे, किसन मुंढे, पोलीस उपनिरीक्षक बाबाजी जगताप तसेच विद्यालयातील शिक्षक गरकळ, केदारी, शिक्षक तसेच कर्मचारी, भगवंत भांबरे, संतोष घुले, नारायण पुंडे, गौरी जगताप, छाया केदारे आदी उपस्थित होते.

# दुचाकी वाहनांसाठी नवीन वाहन क्रमांक मालिका सुरु

## पसंती क्रमांकासाठी ७ सप्टेंबर रोजी अर्ज करता येणार

नगर– दुचाकी संवर्गातील नवीन वाहनांकरीता नवीन वाहन मालिका सुरू करण्यात येत आहे. इच्छुक अर्जदारांनी ७ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २.३० वाजेपर्यंत पसंती क्रमांकाच्या विहीत शुल्काच्या डिमांड ड्राफ्टसह अर्ज चांदणी चौकातील नवीन इमारतीत खिडकी क्रमांक १४ (रोखपाल) येथे जमा करावेत.

वाहन ज्याच्या नावावर असेल त्या व्यक्तीच्या नावाच्या अर्जासोबत त्यांचा पत्त्याचा पुरावा, आधार कार्ड व पॅन कार्ड जोडावे. तसेच, अर्जामध्ये बाहन ज्या व्यक्तीच्या नावे आहे त्या व्यक्तीचा आधार कार्डला सलंग्न असलेला मोबाईल क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. पसंती क्रमांकासाठीचा डिमांड ड्राफ्ट हा अहमदनगर कॅम्प क्रैच ट्रेझरी ब्रेच कोड नं १३२९६ करीता देय असावा. सदर डिमांड ड्राफ्ट आरटीओ अहिल्यानगर या नावाने काढण्यात यावा असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे. एका पसंती क्रमांकासाठी एकच अर्ज आला असेल, त्यांची व एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आले असतील त्यांच्या पसंती क्रमांकाची यादी ७ सप्टेंबर रोजी ४.३० वाजता चांदणी चौकातील नवीन इमारतीत नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येईल. एकाच पसंती क्रमांकासाठी दोन किंवा दोनपेक्षा जास्त अर्ज आलेल्या यादीमधील पसंती क्रमांसाठी ज्यांनी अर्ज केला आहे अशाच अर्जदारांनी ८ सप्टेंबर रोजी दुपारी ०१.३० वाजेपर्यंत त्या क्रमांकासाठी होणाऱ्या लिलावात सहभागी होण्यासाठी पसंती क्रमांक शुल्काच्या डिमांड ड्राफ्ट व्यतिरिक्त जादा रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट बंद लिफाफ्यात सिलबंद करून खिडकी क्रमांक १४ वर जमा करावे. लिलावात सहभागी अर्जदारांती ८ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात उपस्थित रहावे. लिलावासाठी उपस्थित राहणाऱ्या अर्जदाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने ओळखपत्र व प्राधिकार पत्रासह हजर रहावे, कार्यालयात सादर झालेले जादा रक्कमेचे डिमांड ड्राफ्टचे लिफाफे अर्जदारासमोर उघडण्यात येतील. ज्या अर्जदाराने जास्त रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट सादर केला असेल त्यांना तो पसंती क्रमांक देण्यात येईल व उर्वरित कमी रक्कमेचा ड्राफ्ट संबंधित अर्जदारांना परत देण्यात येईल. तसेच, विहीत वेळेत अनुपस्थित अर्जदारांचा कुठल्याही प्रकारचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. पसंती क्रमासाठी कोणत्याही अर्जदारास दूरध्वनी, भ्रमणध्वनी अथवा एसएमएस केला जाणार नाही याची नोंद घ्यावी असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे.

# गुलाटी मोटर्सच्या सत्ते पे सत्तामध्ये अक्षय कराळेंना बाईकची लॉटरी

नगर – अशोक लेलँड कंपनीने ७ लाख ग्राहकांचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केल्याच्या निमित्ताने गुलाटी मोटर्स, एमआयडीसी अहिल्यानगर यांच्या वतीने १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान राबविण्यात आलेल्या सत्ते पे सत्ता लकी ड्रॉ ऑफरचा दिमाखदार समारोप झाला. या ऑफरमध्ये वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना विविध आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी देण्यात आली होती. विशेष म्हणजे लकी ड्रॉमध्ये नगरमधील शेंडी पोखर्डी येथील अक्षय कराळे यांनी अशोक लेलँड कंपनीची गाडी विकत घेतली होती. ५ सप्टेंबर रोजी काढलेल्या लकी ड्रॉमध्ये कराळे यांना दुचाकीची लॉटरी लागली. त्यामुळे गाडी घेतली आणि गाडीच फ्री मिळाली, असा आनंदाचा क्षण कराळे यांनी अनुभवला.


एमआयडीसी येथील गुलाटी मोटर्समधील लकी ड्रॉमधील विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या लकी ड्रॉमध्ये टू–व्हीलर बाईकचे विजेते अक्षय कराळे ठरले. त्यासोबतच एलईडी टीव्हीचे विजेते श्रीकांत लांडे, संजय धस, विजय रोल्ला, दिलीप इंगळे व राजेश बेनकर, तर वॉशिंग मशीनचे विजेते ज्ञानदेव ठुबे, गोरख निकम, राजू येवले, निखिल पालवे व हर्षवर्धन काकडे ठरले.

यावेळी गुलाटी मोटर्सचे संचालक विशाल गुलाटी म्हणाले, अशोक लेलँडने ७ लाख ग्राहकांचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण केला, ही अभिमानाची बाब आहे. ग्राहकांनी गुलाटी मोटर्सवर दाखविलेला विश्वास आणि प्रेम यामुळेच सत्ते पे सत्तासारखी ऑफर यशस्वी झाली. वाहन खरेदीसोबत ग्राहकांना आनंदाचा अनुभव देणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, हा आमच्यासाठी अत्यंत समाधानाचा क्षण आहे. भविष्यातही ग्राहकांच्या विश्वासाला सर्वोच्च प्राधान्य देत उत्कृष्ट सेवा देण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे ते म्हणाले.

या प्रसंगी अशोक लेलँडचे टेरिटरी मॅनेजर वैभव तनेजा, गुलाटी मोटर्सचे सेल्स मॅनेजर अभिषेक खेडकर तसेच गुलाटी मोटर्सचे कर्मचारी उपस्थित होते.

सत्ते पे सत्ता ऑफरच्या माध्यमातून वाहन खरेदीदारांना बक्षिसांची अनोखी मेजवानी देत गुलाटी मोटर्सने ग्राहकांशी असलेले नाते अधिक दृढ केले.

# परताव्याचा धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस २ महिने कारावास, ३ लाखांचा दंड

नगर – कल्पतरू मल्टीपर्पज को–ऑपरेटिव्ह सोसायटी, केडगाव, अहिल्यानगर यांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणात न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत २ महिने साधा कारावास व ३ लाख ३० हजार ५० दंडाची शिक्षा सुनावली आहे.

नगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात झालेल्या सुनावणीत आरोपी अजय सुरेश औसरकर यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(२) अन्वये दोषी ठरविण्यात आले.

कल्पतरू मल्टीपर्पज को–ऑपरेटिव्ह सोसायटीने दिलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी आरोपीने २ लाख ८७ हजार रकमेचा धनादेश दिला होता. सदर धनादेश बँकेत वटविण्यासाठी सादर केला असता तो अनादरित झाला. त्यानंतर संस्थेच्या वतीने न्यायालयात कायदेशीर कार्यवाही करण्यात आली. या प्रकरणात संस्थेच्या वतीने अशोक दत्तात्रय तांबे यांची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. तसेच सादर करण्यात आलेला कागदोपत्री पुरावा आणि संस्थेच्या वतीने अॅड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी केलेला प्रभावी युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला. न्यायालयाने आरोपीस २ महिने साधा कारावास, ३ लाख ३० हजार ५० रुपये दंड आणि दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त २ महिने साधा कारावास, अशी शिक्षा सुनावली. या प्रकरणात कल्पतरू मल्टीपर्पज को–ऑपरेटिव्ह सोसायटी, केडगाव, अहिल्यानगर यांच्या वतीने अॅड. कौस्तुभ कुलकर्णी यांनी काम पाहिले. त्यांना निशांत सोनवणे, अतुल बोराडे व आदित्य रोकडे यांनी सहकार्य केले. सभासदांच्या हिताचे रक्षण, संस्थेच्या आर्थिक शिस्तीचे पालन आणि थकीत कर्जाच्या वसुलीसाठी कायदेशीर मार्गाने प्रभावी पाठपुरावा करणाऱ्या कल्पतरू मल्टीपर्पज को–ऑपरेटिव्ह सोसायटीचा हा न्यायलयीन विजय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

# सारडा महाविद्यालयाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार शिरूरच्या डॉ. काकासाहेब मोहिते यांना जाहीर



नगर – पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वतीने पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आलेला स्व. प्राचार्य एस. एम. कुलकर्णी आदर्श प्राचार्य पुरस्कार यावर्षी शिरूर येथील सी. टी. बोरा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सचे प्राचार्य डॉ. काकासाहेब मोहिते यांना जाहीर करण्यात आला आहे.

पुरस्काराचे हे चौथे वर्ष असून रुपये २५ हजार रोख, गौरवचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे वितरण ८ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर यांच्या हस्ते तसेच नामांकित शिक्षणतज्ज्ञांच्या उपस्थितीत सारडा महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे, अशी माहिती सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी दिली.

सारडा महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य म्हणून एस. एम. कुलकर्णी यांनी १९६२ ते १९७४ या काळात द्रष्टा शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त चार वर्षांपूर्वी हा आदर्श प्राचार्य पुरस्काराचा उपक्रम सारडा महाविद्यालयाने सुरु केला. समाजाभिमुख व तळागाळातील शैक्षणिक कार्यासाठी प्रोत्साहन मिळावे, हा या पुरस्कारा मागील प्रमुख उद्देश आहे.

आदर्श प्राचार्य पुरस्कारासाठी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन करण्यात आली होती. समितीत डॉ. धोंडीराम पवार, बागेश्री मंठाळकर तसेच हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष अॅड. अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष व वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, प्रा. ज्योती कुलकर्णी व प्राचार्य प्रा. डॉ. माहेश्वरी गावित यांचा समावेश होता. निवड समितीने प्राप्त प्रस्तावांचे सखोल, तपशीलवार व तुलनात्मक अध्ययन करून या पुरस्काराची घोषणा केली.

आदर्श प्राचार्य पुरस्कार घोषित झालेले प्राचार्य डॉ. काकासाहेब मोहिते हे गेल्या ११ वर्षांपासून शिरूर येथील सी. टी. बोरा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. त्यापूर्वी त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून तसेच पुणे येथील एच. व्ही. देसाई महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या नावावर तीन पेटंटची नोंद असून, त्यांना सी. व्ही. रमण आदर्श शिक्षक राष्ट्रीय पुरस्कार, जामखेड तालुका भूषण पुरस्कार तसेच कै. जयंत नारळीकर स्मृती विज्ञान लेखन पुरस्कार अशा नामवंत पुरस्कारांनी यापूर्वी गौरविले आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन समन्वयक डॉ. किरणकुमार साळवे यांनी केले आहे.

# शिक्षक : घडवताना स्वतःही घडणारा प्रवास

काही धडे पानांवर लिहिले जातात; पण सर्वांत चिरंतन धडे हृदयावर कोरले जातात. अध्यापन हा केवळ एक व्यवसाय नाही; तो हृदयाचा एक सुंदर प्रवास आहे – जबाबदारी, संयम, चिकाटी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्यावर विश्वास ठेवून सोपवलेल्या मनांबद्दलच्या आपुलकीने घडत जाणारा प्रवास.

इतर प्रत्येक व्यवसायाप्रमाणेच अध्यापनालाही स्वतःची आव्हाने आणि जबाबदाऱ्या आहेत. काही दिवस असे असतात, जेव्हा मन चिंतांनी व्यापलेले असते, कामाचा ताण जाणवत असतो आणि अंतर्मन थकून गेलेले असते. पण शाळेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवताच वातावरण बदलते. वर्गातील उत्साह, प्रश्नांनी भरलेली जिज्ञासा, नव्या गोष्टी जाणून घेण्याची ओढ आणि संवादातून निर्माण होणारी ऊर्जा शिक्षकाच्या मनालाही नव्याने जागृत करते. कदाचित, हाच अध्यापनाचा शांत आणि अदृश्य जादुई स्पर्श असावा.

असे म्हटले जाते की, सर्वोत्तम शिक्षक केवळ पुस्तकातून नव्हे, तर मनापासून शिकवतात. या वाक्यात अध्यापनाचे खरे सार दडलेले आहे. कारण शिकवणे म्हणजे केवळ माहिती पोहोचवणे नव्हे; तर ज्ञानामागचा अर्थ समजावून देणे, विचारांना दिशा देणे आणि शिकण्याची अंतःप्रेरणा जागृत करणे होय.

एखादा शिक्षक कठीण दिवसाचे अदृश्य ओझे मनात घेऊन शाळेत येऊ शकतो; पण एखादा मनापासून विचारलेला प्रश्न त्याचा हरवलेला उत्साह पुन्हा जागवू शकतो. एखाद्या प्रयत्नातील प्रगती समाधान देऊ शकते, तर प्रेमाची एखादी साधीशी अभिव्यक्ती आपल्याला पुन्हा एकदा आठवण करून देते की आपण करत असलेले कार्य किती अर्थपूर्ण आहे. आणि मग येतो तो अनमोल, अगदी साधासुधा वाटणारा क्षण– जेव्हा एखादा विद्यार्थी शिक्षकाकडे पाहून म्हणतो, तुम्ही माझ्या सर्वांत आवडत्या शिक्षक आहात.

विद्यार्थ्यासाठी हे कदाचित काही साधे शब्द असतील; पण एका शिक्षकासाठी त्या काही शब्दांत संपूर्ण जग सामावलेले असते.

ते शब्द आपल्या प्रत्येक संयमी स्पष्टीकरणाला, पुन्हा पुन्हा शिकवलेल्या प्रत्येक धड्याला आणि प्रत्येक शांत प्रयत्नाला एक वेगळाच अर्थ देतात. ते आपल्याला जाणवून देतात की आपले कार्य पाठ्यपुस्तकाच्या पानांपलीकडे जाते. आज आपण एखादा धडा शिकवतो; पण त्याचा प्रभाव एखाद्याच्या मनात अनेक वर्षे जिवंत राहू शकतो.

कधी एखादा प्रश्न शिक्षकाला स्वतःच्या ज्ञानाचा पुन्हा शोध घ्यायला भाग पाडतो. कधी एखादी चूक अधिक संयमाने समजावून सांगण्याची गरज शिकवते. कधी एखाद्या प्रयत्नाचे यश शिक्षकाच्या मनात समाधान निर्माण करते, तर कधी अपेक्षित परिणाम न मिळाल्याने स्वतःच्या पद्धतींकडे नव्याने पाहण्याची संधी मिळते. म्हणूनच अध्यापन हा एकतर्फी प्रवास नाही. शिक्षक शिकवतो, पण शिकतही राहतो.

एखाद्या विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान, एखादा उत्सुक प्रश्न किंवा आत्मविश्वासाने व्यक्त केलेला विचार – हे क्षण शिक्षकाला जाणवून देतात की त्याचे कार्य केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित नाही. वर्गातील प्रत्येक संवादामागे व्यक्तिमत्त्व घडवण्याची एक सूक्ष्म प्रक्रिया सुरू असते.


आज आपण एखादा धडा शिकवतो; पण त्या धड्याचा प्रभाव कधी आणि कुठे उमटेल, हे सांगता येत नाही. म्हणूनच शिक्षकाची जबाबदारी केवळ विषयज्ञानापुरती मर्यादित राहत नाही. शिक्षक जिज्ञासेला दिशा देतो. प्रश्न विचारण्याचे धैर्य निर्माण करतो. चुका झाल्यावर पुन्हा प्रयत्न करण्याची वृत्ती रुजवतो. यशापेक्षा प्रयत्नांचे महत्त्व समजावतो. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, स्वतःवर विश्वास ठेवण्याची ताकद देतो. शिक्षकाची भूमिका वर्गाच्या चार भिंतींपलीकडे जाते. तो केवळ ज्ञानाचा वाहक नसतो; तो मूल्यांचा संवाहक, विचारांना दिशा देणारा मार्गदर्शक आणि अनेकदा न बोलताही विश्वास देणारी उपस्थिती असतो.

शिक्षकाचे महत्त्व जगातील विविध संस्कृतींमध्ये आणि श्रद्धांमध्ये मान्य केले गेले आहे. ख्रिस्ती श्रद्धेमध्ये येशू ख्रिस्त यांना महान शिक्षक महान शिक्षक म्हणून स्मरण केले जाते. त्यांच्या शिकवणीने काळाच्या सीमा ओलांडल्या आणि असंख्य जीवनांमध्ये परिवर्तन घडवून आणले. म्हणूनच, शिक्षकाची भूमिका केवळ शाळेच्या चार भिंतींपुरती मर्यादित नसते. आपण केवळ ज्ञान देत नाही; आपण जिज्ञासेची ज्योत प्रज्वलित करतो. आपण मुलांना फक्त परीक्षांसाठी तयार करत नाही; आपण त्यांना जीवनासाठी तयार करतो. ज्ञान आपल्याला भक्कम पाया देते. अनुभव आपल्याला प्रगल्भता देतो. पण करुणा, संयम, संवेदनशीलता आणि योग्य मार्गदर्शन शिक्षकत्वाला अर्थ देतात.

अध्यापनाच्या प्रवासात अनेकदा शिक्षक स्वतःलाही नव्याने ओळखत जातो. संयमाची खरी परीक्षा वर्गात होते. नेतृत्वाचा अर्थ जबाबदारी स्वीकारताना उमगतो. संवेदनशीलतेची जाणीव इतरांच्या अडचणी समजून घेताना होते. आणि आपल्या शब्दांचा एखाद्याच्या आत्मविश्वासावर होणारा परिणाम जाणवल्यावर भाषेची आणि वर्तनाची ताकद उमगते.

म्हणूनच, आपण ज्यांना घडवण्याचा प्रयत्न करतो, त्यांच्या सहवासातून आपणही सतत घडत असतो. त्यांची जिज्ञासा आपल्याला अधिक जाणून घेण्यास प्रवृत्त करते. त्यांचे प्रश्न आपल्याला पूर्वग्रहांच्या पलीकडे विचार करायला शिकवतात. त्यांचे प्रयत्न आपल्याला चिकाटीची आठवण करून देतात. आणि त्यांचा विश्वास आपल्याला आपल्या जबाबदारीचे गांभीर्य जाणवून देतो. या देवाणघेवाणीतच अध्यापनाचे सौंदर्य दडलेले आहे.


शिक्षक म्हणून आपला प्रवास कधीच पूर्ण होत नाही. प्रत्येक नवीन वर्ग आपल्याला नव्याने शिकवतो, प्रत्येक अनुभव आपल्याला समृद्ध करतो आणि प्रत्येक पिढी आपल्यात काहीतरी नवे रुजवून जाते. कदाचित म्हणूनच अध्यापन हा केवळ एक व्यवसाय राहत नाही; तो स्वतःला घडवत राहण्याचा एक अखंड प्रवास बनतो. आपण इतरांच्या आयुष्यात प्रकाशाची वाट दाखवण्याचा प्रयत्न करत असताना, त्या प्रकाशाची काही किरणे आपल्या अंतर्मनालाही उजळून निघतात. कारण शिक्षक घडवतो पण त्या घडवण्याच्या प्रक्रियेत




शिक्षक स्वतःही सतत घडत असतो. मनांना दिशा देणाऱ्या, विचारांना आकार देणाऱ्या स्वप्नांना बळ देणाऱ्या आणि प्रत्येक दिवसाला अर्थपूर्ण बनवणाऱ्या सर्व शिक्षकांना शिक्षकदिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

– **रसिका** (शिक्षिका / लेखिका)
डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन अॅण्ड जर्नलिज्म, पुणे यूनिवर्सिटी

# भारताचे नवीन संसद भवनः वास्तुकला आणि सिव्हिल इंजिनिअरिंगचा आधुनिक मापदंड





भारताची राजधानी नवी दिल्ली येथे २८ मे २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सेंट्रल व्हिस्टा या प्रकल्पाअंतर्गत नवीन संसद भवनाचे उद्घाटन झाले. आपण सगळ्यांनीच टी.व्ही.वर आणि पेपरमध्ये यासंदर्भात बातम्या पाहिल्या आणि वाचल्या आणि तेव्हापासूनच आपण एक आर्किटेक्ट आणि स्वतंत्र भारताचे सुजाणनागरिक या नात्याने नविन संसद भवन समक्ष बघावे,लोकशाहीच्या या नव्या मंदिराला भेट द्यावी आणि संसदेच्या कामकाजाचा आणि वास्तुकलेचा अनुभव घ्यावा, अशी इच्छा मनात जागृत झाली. पण हे सहजासहजी होणे शक्य नाही ही कल्पना देखील होती. देशाचे सर्वोच्च कायदेमंडळ आणि अतिसंवेदनशील सुरक्षा क्षेत्र असल्यामुळे इथे विनापरवाना किंवा हवे तेव्हा प्रवेश करता येत नाही. संसद भवनात प्रवेश मिळविण्यासाठी काही कायदेशीर प्रक्रिया आणि नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागते. संसदेच्या प्रेक्षक गॅलरीपर्यंतचा प्रवास अजिबात सोपा नाही. अधिकृत व्यक्तिची शिफारस आणि ऑनलाईन नोंदणी आवश्यक असते. संसदभवनाचे पास मिळण्यापूर्वी अर्जदाराची पार्श्वभूमी आणि ओळख स्थानिक किंवा राज्य पोलिसांकडून पडताळली जाते. अनेक सोपस्कार पार पडल्यानंतर अर्ज मंजूर झाल्यास मोबाईलवर एक विशेष क्यु आर कोड येतो. प्रत्यक्ष भेटीच्या दिवशी हा क्यु आर कोड आणि मुळ ओळखपत्र म्हणजेच आधार कार्ड घेऊन प्रवेशद्वारावर जावे लागते. तिथे बायोमेट्रीक नोंदणी म्हणजेच फोटो आणि बोटांचे ठसे घेतले जातात आणि आपल्याला 'स्मार्ट व्हीजीटर्स कार्ड' दिले जाते. हा पास मर्यादित कालावधीसाठीच वैध असतो. भेट संपल्यानंतर बाहेर पडतांना हे कार्ड परत सुरक्षारक्षकांकडे अनिवार्यपणे जमा करावे लागतात. कोणत्याही इलेक्ट्रॉनिक वस्तु, कागदपत्रे, इतर साहित्य आत नेण्यास सक्त मनाई आहे. नवीन संसद भवनाची सुरक्षा आणि पावित्र्य राखण्यासाठी हे कडक नियम पाळणे अतिशय आवश्यक असतात. नियमांच्या चाकोरीमध्ये राहून आपण एक शिस्तबद्ध आणि अभिमानास्पद सोहळ्याचे साक्षीदार होऊ शकतो. वर उल्लेखलेल्या नवीन संसद भवन बघण्यासाठीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी आम्हाला काही महिने लागले परंतू देव कृपेने २२.१२.२०२४ हा दिवस आमच्यासाठी आयुष्यातील अविस्मरणीय असासुर्योदय घेऊन आला. नवीन संसदभवनाला भेट देण्याची उत्सुकता ही केवळ इमारत पहाण्याची उत्सुकता नसून ती आपल्या देशाच्या लोकशाही परंपरेवर प्रेम करण्याची आणि तिच्या प्रगतीचा साक्षीदार होण्याची एक आनंदाची भावना होती.

कडक सुरक्षा प्रक्रिया पार करून आम्ही या संकुलात प्रवेश केला. नवीन संसद भवन हे भारतीय लोकशाहीचा आधुनिक चेहरा असण्यासोबतच वास्तुकला (Architecture) आणि स्थापत्य अभियांत्रिकीचा (civil Engineering) चा एक उत्कृष्ठ नमुना आहे. ही वास्तू तंत्रज्ञान आणि भारतीय संस्कृतीचा सुंदर संगम आहे ही गोष्ट आम्हाला तेथे पदोपदी जाणवत होती.

ब्रिटीशकालीन जुन्या संसद भवनाच्या मर्यादा ओळखुन आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन या वास्तूची निर्मिती करण्यात आली आहे. १० डिसेंबर २०२० रोजी पायाभरणी करण्यात आली आणि २८ मे २०२३ रोजी या वास्तुचे उद्घाटन करण्यात आले. अंदाजे २९ महिन्यात ही वास्तु वापर करण्यायोग्य उभी करण्यात आली. ही वास्तू म्हणजे विसाव्या शतकातील आधुनिक अभियांत्रिकी कौशल्य आणि भारतीय वास्तूकलेचा एक अद्वितीय संगम आहे. संसदेची जुनी इमारत वर्तुळाकार होती तर नवीन इमारत त्रिकोणी आकाराची आहे. उपलब्ध भूखंडाचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि त्रिकोणी भूखंडाच्या भौमितीकरचनेला वाव मिळावा म्हणुन हा आकार निवडण्यात आला असावा. हे नवीन संसद भवन सुमारे ६४,५०० चौरसमीटर क्षेत्रफळात पसरलेले चार मजली संकुल आहे. यात लोकसभेसाठी ८८८ जागा आणि राज्यसभेसाठी ३८४ जागांची क्षमता आहे. आहे. भविष्यातील संयुक्त अधिवेशनासाठी लोकसभा कक्षामध्ये १२७२ सदस्यांची बसण्याची क्षमता निर्माण करण्यात आली आहे. मंत्री आणि खासदार यांच्यासाठी स्वतंत्र, सुसज्ज आणि आधुनिक तंत्रज्ञानयुक्त कार्यालये तयार करण्यात आली आहेत. विविध संसदीय समित्यांच्या बैठकीसाठी अत्याधुनिक ऑडियो – विजुवल सिस्टम, व्हिडियो कॉन्फरन्सिंग आणिस्वतंत्र हायस्पीड इंटरनेट जोडणी असलेल्या भव्य कमिटी रुम्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संसद सदस्यांसाठी, कर्मचाऱ्यांसाठी आणि पत्रकारांसाठी स्वच्छ आणि हायजिनीक डायनिंग हॉलची सोय आहे. या इमारतीमधील स्वयंपाकघर अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक उपकरणांनी सज्ज असून तिथे भारतातील विविध प्रांतातील खाद्यपदार्थ बनविण्याची सोय आहे. नवीन संसद भवन हे पूर्णपणे दिव्यांग स्नेही बनविण्यात आले आहे. रॅम्प, व्हील चेयर, टेक्टाईल टाईल्स, विशेष लिफ्टस आणि ब्रेल लिपीतील माहितीचे फलक यामुळे प्रत्येकाला येथे सहज वावरता येते.

संसदेच्या कामकाजादरम्यान वैदयकिय आपात्कालीन परिस्थीती हाताळण्यासाठी पूर्णवेळ डॉक्टर, पैरामेडीकल स्टाफ आणि आधुनिक वैदयकिय उपकरणांनी सज्ज असे वैद्यकिय कक्ष या संकुलात कार्यरत आहे. कोणत्याही आपात्कालीन प्रसंगी तातडीने उपचार मिळण्यासाठी कार्डीयक ॲम्ब्युलन्सची सोय नेहमी उपलब्ध असते. इमारतीच्या आतील भागात आगीचा प्रसार रोखणारी विशेष रचना करण्यात आली असुन, आपात्कालिन परिस्थितीत बाहेर पडण्यासाठी हवेशीर मार्ग तयार करण्यात आले आहेत.

वृत्तवाहीन्यांच्या प्रतिनीधींसाठी आणि पत्रकारांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आले आहेत. १००% युपीस पॉवर बॅक–अप आणि हायस्पीड वायफाय नेटवर्कमुळे तांत्रिक कामात कोणतीही अडचण येत नाही. इमारतीमध्ये आणि परीसरात लोकप्रतिनीधी आणि कर्मचाऱ्यांसाठी बहुमजली सुरक्षित पार्किंग व्यवस्था केली आहे. प्रवेशद्वारावर ऑटोमेटेड बॅग स्कैनर, बायोमेट्रिक स्कॅनिंग आणि स्मार्ट पास सिस्टीम् बसवलेली आहे ज्यामुळे सुरक्षेशी तडजोड न करता लोकांची येजा होत असते. संकुलाच्या कानाकोपऱ्यात २४ तास नजर ठेवण्यासाठी हायटेकक्लोज सर्किट कैमेरे, थर्मल इमेजिरेक्टर्स आणि स्वयंचलित स्कैनर्स बसविण्यात आले आहेत. या सगळ्यांचे नियंत्रण एक केंद्रिय कमांड सेंटरमधुन करण्यात येते.

आमच्या संसद भवनातील वास्तव्यात आम्हाला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली आणि ती म्हणजे नवीन संसद भवनात उपलब्ध असलेल्या सेवा आणि सुविधा केवळ भौतिक सुविधांचा संच नसूनत्या लोकशाहीच्या कामकाजाला अधिक गतिमान, सुरक्षित आणि सुलभ बनविणाऱ्या व्यवस्था आहेत. संसद भवन बघताना मला असे पदोपदी जाणवत होते की कार्यक्षम प्रशासकिय सुविधा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड या संसद भवनाला जगातील सर्वात आधुनिक संसदीय संकुलांच्या पंक्तित नेऊन बसवते. ही वास्तू म्हणजे केवळ भारताच्या लोकशाहीचे भव्य केंद्र नाही तर या वास्तूची निर्मिती करतांना सुरक्षा आणि सुराक्षितताया मुद्यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.

जुन्या संसदभवनाची ऐतिहासीक परंपरा पुढे नेतनव्याइमारतीत एक अत्यंत भव्य, डिजीटल आणि अत्याधुनिक संसदीय ग्रंथालयाची निर्मीती करण्यात आली आहे जी भारतीय लोकशाही आणि कायदेविषयक अभ्यासाचा मुख्य कणा आहे. मला वैयक्तीकरित्या वाचनाची आवड असल्यामुळे आणि पुस्तके बघण्यात, संग्रहीत करण्यात रस असल्यामुळे या दालनाला भेट देतांना मला विशेष आनंद होत होता. संसदेत या ग्रंथालयाचे अंतर्गत वास्तुकला आणि डिझाइन अशा प्रकारे केले गेले आहे जेणेकरून खासदारांना आणि अभ्यासकांना शांततेत वाचन, संशोधन आणि विचार–विनीमय करता येईल. खासदारांना सदन सुरु असतांना किंवा अभ्यासासाठी आवश्यक असलेली कोणतीही माहिती एका क्लिकवर मिळावी म्हणून अत्याधुनीक टॅब्लेटस् आणि कम्प्युटर टर्मिनलची सोय करण्यात आली आहे. संसदेला पेपरलेस बनविण्यात हे ग्रंथालय महत्वाची भूमिका बजावते. या ग्रंथालयात केवळ छापील पुस्तकेच नव्हे, तर जगभरातील कायदे, संविधान, इतिहास अर्थशास्त्र आणि राजकारणावर आधारित लाखो डिजिटल पुस्तके, जर्नल्स आणि रिसर्च पेपर उपलब्ध आहेत. वाचनालयात उच्च दर्जाच्या भारतीय सागवानी लाकडापासूनबनवलेले सुंदर फर्निचर आणि डोळ्यांना त्रास होणार नाही अशी अत्याधुनिक प्रकाशयोजना बसवण्यात आली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आजपर्यंत च्या सर्व कायदे, लोकसभेच्या आणि राज्यसभेच्या जुन्या डिबेट्स, कायदेविषयक मसुदे आणि महत्वाच्या ऐतिहासीक नोंदी येथे सुरक्षीत ठेवण्यात आल्या आहेत. देश विदेशातील कायदेतज्ञ, इतिहासकार आणि संशोधकांसाठी हा एक अत्यंत मोलाचा ठेवा मानला जातो, ज्यातून भारतीय लोकशाहीचा विकासाचा संपूर्ण प्रवास समजण्यास मदत होते. तंत्रज्ञानाची जोड आणि प्राचीन ज्ञानाचा ठेवा जपणारी ही वास्तू येत्या काळात भारताच्या कायदे निर्मितीला अधिक मजबूत आणि प्रगल्भ बनविणार यात शंकाच नाही. नवीन संसद भवनातील हे अत्याधुनिक ग्रंथालय केवळ पुस्तकांचा संग्रह नाही तर ते भारताच्या बौध्दीक क्षमतेची आणि लोकशाहीच्या विचारधारेची उर्जा आहे.

नवीन संसदभवन म्हणजे भारताच्या हजारो वर्षांच्यासंस्कृतीचा आणि लोकशाहीच्या प्रवासाचा जिवंत दस्ताऐवज आहे. या इमारतीमध्ये भारताचा इतिहास आणि संविधान निर्मातीचा प्रवास भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष संग्रहालय गॅलरीज तयार करण्यात आल्या आहेत. 'संविधान गॅलरी'चे मुळ आकर्षण म्हणजे भारताच्या संविधानाची मुझे हस्तलिखीते आणि त्यावर केलेल्या सुंदर कलाकृती येथे पहाता येतात. संविधान निर्मितीचा संपूर्ण ऐतिहासिक प्रवास डिजीटल व भौतिक स्वरुपात इथे मांडण्यात आला आहे. 'भारत–लोकशाहीची जननी'या गॅलरीमध्ये सिंधू संस्कृतीच्या काळापासून ते विविध प्राचीन गणराज्या–पर्यंत भारताच्या मातीत लोकशाही कशी रुजली होती याचा इतिहास मांडला गेला आहे. येणाऱ्या पर्यटकांना हा इतिहास सहज समजण्यासाठी आधुनिक टचस्क्रिन, ऑडिओ – व्हीज्युअल शो आणि डीजीटल प्रोजेक्शनचा वापर करण्यात आला आहे. 'शिल्प आणि वारसा गॅलरी'मध्ये देशाच्या कान्याकोपऱ्यातील सांस्कृतिक विविधता एकाच छताखाली अनुभवायला मिळावी अशा पद्धतीने या संग्रहालयाचे आन्तरीक नियोजन करण्यात आले आहे. या गॅलरीत भारताच्या विविध राज्यातील शिल्पकला, हस्तकला आणि सांस्कृतिक प्रतीकांचे दर्शन घडविणारे पुतळे आणि कलाकृती ठेवण्यात आहेत. 'श्रमयोगी गॅलरी' या गॅलरीत ज्या हजारो कामगारांनी, इंजिनिअर्सनी आणि कारागिरांनी अहोरात्र मेहनत करून ही भव्य वास्तु उभी केली त्यांच्या विशेष योगदानासाठी ही गॅलरी समर्पित आहे. यात त्यांच्या कामाची छायाचित्रे आणि आठवणी जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. या सर्व गॅलरीज केवळ प्रेक्षणीय वस्तुंचे प्रदर्शन नाही तर ती भारताच्या गौरवशाली इतिहासाचा आणि लोकशाही मुल्यांचा ठेवा आहे. संसद भवनला भेट देणाऱ्या माझ्यासारख्या प्रत्येकासाठी हा इतिहास आणि भविष्याचा सुंदर संगम अनुभवणे एक अभिमानास्पद क्षण ठरतो.

नवीन संकुलात् नागरिकांसाठी आणि अतिमहत्वाच्या व्यक्तिंसाठी वेगवेगळे प्रवेशद्वार निर्माण करण्यात आले आहेत. त्यांना 'ज्ञानद्वार', 'शक्तिद्वार'आणि 'कर्मद्वार' अशी नावे देण्यात आली आहेत. लोकसभेच्या अंतर्गत सजावटीची थीम भारताचा राष्ट्रीय पक्षी 'मोर' आहे आणि आतील रंगसंगती मोरपीसाच्या रंगावरून प्रेरीत आहे. राज्यसभेची थीम भारताचे राष्ट्रीय फुल' कमळ'वर आधारीत आहे. रंगसंगतीमध्ये आणि डिझाईनमध्ये कमळाच्या आकाराचा वापर केला आहे.

लोकसभेच्या अध्यक्षांच्या आसनाजवळ स्थापित 'सेंगोल' आपल्याला भारताच्या प्राचीन संस्कृतीचा आणि ऐतिहासीक गौरवाचा वारसा सांगतो. हा राजदंड केवळ एक सोन्याची छडी नसुन तो न्याय, कर्तव्य आणि सत्तेच्या हस्तांतरणाचे पवित्र प्रतिक आहे. प्राचीन चोल साम्राज्यात राजा बदलतांना किंवा सत्तेचे हस्तांतरण करतांना नव्या राजाला हा राजदंड सोपविण्याची परंपरा होती. भारताला १४ ऑगस्ट १९४७ च्या रात्री ब्रिटीशांकडून सत्ता हस्तांतरीत होत असतांना तत्कालीन देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी तामिळनाडूतील मठाच्या मठाधिपतींकडून हा सेंगोल स्विकारला होता. स्वातंत्र्याच्या त्या ऐतिहासीक क्षणी भारताच्या सार्वभौमत्वाचे ते पहिले प्रतिक बनले होते. बरीच वर्षे हा राजदंड प्रयागराज येथील संग्रहालयात ठेवण्यात आला होता. नविन संसदभवनाच्या उद्घाटन प्रसंगी हा ऐतिहासीक 'संगोल' अत्यंत विधीवत पद्धतीने आणि अभिमानाने स्थापित करण्यात आला. संसद हे कायदे करण्याचे सर्वोच्च मंदिर आहे. या मंदिरात न्याय आणि निष्पक्षतेचा संदेश सतत मिळत रहावा म्हणून राजदंडाची स्थापना लोकसभेत करण्यात आली आहे. या राजदंडाची उंची आणि चमक संपूर्ण सभागृहात वेगळाच राजसी आणि पवित्रेचा भाव निर्माण करते.

लोकसभा आणि राज्यसभेच्या प्रत्येक सदस्याच्या आसनासमोर आधुनिक टचस्क्रिन डिस्प्ले बसविण्यात आले आहेत. याद्वारे सदस्यांना डिजिटल कागदपत्रे, कायदे आणि चर्चेचे विषय पहाणे सोपे होते. तसेच मतदानासाठी स्वयंचलित, आधुनिक बायोमेट्रीक वोटिंग सिस्टीमचा वापर केला गेला आहे. सभागृहातील प्रत्येक बाकड्यावर प्रोग्रॅमेबल मायक्रोफोन बसविण्यात आले आहेत. तसेच संसदेत विविध प्रादेशिक भाषांमध्ये होणारी भाषणे तत्काळ समजण्यासाठी रियल टाईम भाषांतर आणि रेकॉर्डींगची अत्याधुनिक यंत्रणा कार्यरत आहे. नवीन सभागृहांची रचना आधुनिक ॲकॉस्टिक तंत्रज्ञानानुसार करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक सदस्याचा आवाज इतर कोणाचाही अडथळा न येता स्पष्टपणे एकू येतो. संपूर्ण संकुलात आणि सभागृहांमध्ये मोठ्या स्क्रिन आणि अत्याधुनिक ऑडियो व्हिजुवल प्रणाली बसविण्यात आली आहे ज्यामुळे संसदेचे कामकाज पहाणे आणि त्याचे प्रसारण करणे अतिशय सुलभ जाते.

या सभागृहात फक्त सदस्य आणि तेथील कर्मचारीयांनाच प्रवेश दिला जातो. आम्ही ही दोन्ही सभागृहे व्ही.आय.पी. गॅलरीत बसुन बघितली. जे गाईड आमच्या बरोबर होते त्यांनी सांगितले की सदस्य हे जनतेने निवडुन दिलेली दिलेले प्रतिनिधी असतात या गोष्टीला अनन्य साधारण महत्व असून तेथे अन्य लोकांचा प्रवेश वर्जित आहे. दुसऱ्या कोणत्याही देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती, राजे किंवा अन्य महत्त्वाचे प्रतिनिधी देखिल या सभागृहांत येऊ शकत नाही. त्यांच्यासाठी वेगळा कक्ष स्थापन करण्यात आला आहे. तेथुन ते कामकाज बघु शकतात किंवा संबोधन देऊ शकतात. जेव्हा आम्ही त्या व्हीआयपी गॅलरीत प्रवेश केला तेव्हाच्या माझ्या मनातल्या भावना मी व्यक्त करू शकत नाही की काय होत्या. डोळ्यातुन पूर्णवेळ आनंदअश्रू वाहत होते. स्वतःच्या त्या सभागृहात असण्यावर विश्वासच बसत नव्हता. आपण जे टिव्हीवर बघतो आजते प्रत्यक्षात बघण्याचा आनंदच काही और होता. आमच्यासाठी वेळ जशी थांबली होती. ज्या खुर्चीवर माननीय लोकसभा अध्यक्षबसतात, देशाचे पंतप्रधान बसतात, सर्व मंत्री बसतात आणि देशाचेकामकाज सुरळीतपणे चालवतात ती खुर्ची, ते टेबल, ती जागा आम्ही समक्षबघत होतो. कुठे पहावे, किती पहावे, किती आठवणी आपण सोबत घेऊन जाव्या काहीच कळत नव्हते. आम्ही अगदी निशःब्द आणि स्तब्ध होऊन त्या क्षणाला पूर्णपणे वर्तमानात जगण्याचा प्रयत्न करीत होतो.

संसद भवनाच्या आतील सजावटीमध्ये भारताच्या विविध राज्यातील हस्तकता, शिल्पकला आणि पारंपारीक प्रतिकांचा सुंदर वापर करण्यात आला आहे. भिंतींवर आणि कमानींवर केलेले सुंदर नक्षीकाम भारतीय संस्कृतीची समृद्धी दर्शवते. आतील बाजुस उच्च दर्जाचे ध्वनीनियंत्रण पॅनल बसविण्यात आले आहेत, ज्यामुळे मोठा आवाज किंवा गोंगाट न होता प्रत्येक सदस्याचा आवाज स्पष्ट ऐकु येतो. आंतरीक भागात दिवसा नैसर्गिक प्रकाश येईल अशी रचना करण्यात आली आहेतर संध्याकाळी डोळ्यांना सुखद वाटणाऱ्या आणि वास्तुचे सौंदर्य वाढवणाऱ्या एलईडी लाईट बसविण्यात आल्या आहेत. आतील व्हरांडे आणि हॉलच्या भिंतींवर भारताचा स्वातंत्र्यलढा, संविधान निर्मितीचा इतिहास आणि देशाच्या प्रमुख महापुरुषांचे प्रसंग दर्शवणारी सुंदर चित्रे आणि शिल्पे लावण्यात आली आहेत. ही आंतरिक सजावट हे केवळ देखावा नसून भारतीय अस्मितेची आणि कलागुणांची जिवंत वाहीनीच आहे.

नवीन संसद भवन हे भारताच्या बांधकाम क्षेत्राची क्षमता आणि तांत्रिक प्रगती जगासमोर मांडणारे प्रतीक आहे. 'टाटा प्रोजेक्टस लिमिटेड'ने या प्रकल्पाचे काम पूर्ण केले असून, पारंपारीक पद्धतींना फाटा देत यात अत्याधुनिक अभियांत्रिकी पद्धतींचा मोठ्या प्रमाणावर वापर केला गेला. या भव्य इमारतीच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणावर प्री–फॅब्रिकेटेड घटकांचा वापर करण्यात आला. कारखान्यात आधीच तयार करून घेतलेले स्ट्रक्चरल भाग थेट साईटवर जोडण्यात आले ज्यामूळे कामाचा वेग वाढला आणि बांधकामाची अचूकता उत्तम प्रकारे राखता आली. छताचा भाग आणि विस्तीर्ण मोठ्या सभागृहांसाठी आधुनिक मोड्युलर स्टिल व तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आता ज्यामुळे इमारतीला प्रचंड मजबूती मिळाली आणि वजन नियंत्रित ठेवण्यास मदत मिळाली. या संपूर्ण प्रकल्पात बीआयएम या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. या डिजीटल तंत्रज्ञानामुळे वास्तुचे 3D मॉडेल तयार करून डिजाईनमधील त्रुटी दूर करणे शक्य झाले. सिविल इंजिनीयर, आर्किटेक्ट आणि बाकी काम करणाऱ्या सर्व टीम यांच्यात योग्य समन्वय राखण्यासाठी बी आय एम मुळे संपूर्ण प्रकल्पाचे मॉनिटरिंग डिजीटल माध्यमातुन सुलभ झाले. दिल्लीच्या भूगर्भातील मातीची रचना लक्षात घेऊन आणि इमारतीचा प्रचंड भार विचारात घेता उच्च दर्जाची पायाभरणी करण्यात आली. नवी दिल्ली ही सिस्मॉलॉजीच्या दृष्टीने झोन खतमध्ये मोडते यामुळे विशेष शॉक ॲब्जॉरबिंग स्ट्रक्चर्स आणि आधुनिक काँक्रिट तंत्रज्ञानाचा वापर करून इमारत पूर्णपणे भूकंपरोधक बनवण्यात आली आहे. आधुनिक काळात हरीत बांधकामाचे नियम पाळत साईटवर धुळीचे प्रदुषण रोखण्यासाठी स्मॉग गन आणि वॉटर स्प्रिंकलरचा बाधकाम चालू असतांना सतत वापर करण्यात आला आणि साहीत्याची नासाडी टाळण्यासाठी झीरो वेस्टचे धोरण राबवले गेले.राजस्थानातील वालुकाश्म, महाराष्ट्रातील सागवानी लाकुड, उत्तर प्रदेशचे गालीचे यासारखे भारताच्या विविध भागातुन आलेले साहित्य अचूक अभियांत्रिकी पद्धतीने जुळवून, पारंपारीक सौंदर्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उत्तम समतोल साधला गेला. ही वास्तु पूर्णपणे 'मेक इन इंडिया'संकल्पनेच्या आधारे भारतात आणि भारतीय कलाकारांच्या हातुन साकारली गेली आहे. बांधकामासाठी वापरण्यात आलेले प्रत्येक साहित्य आणि आणि प्रत्येक वस्तू ही भारताच्या विविध राज्यातून असलेल्या समृद्ध संस्कृतीचे आणि स्थानिक उद्योगांचे दर्शन घडवते. इमारतीसाठी लागणाऱ्या अनेक छोट्या मोठ्या वस्तुंसाठी देशातील स्थानिक उद्योगांना संधी ज्यामुळे 'लोकल फॉरव्होकल 'या मंत्राला बळ मिळाले. ही इमारत 'ग्रीन बिल्डींग' या संकल्पनेवर चालते. यात अत्याधुनिक उर्जा – व्यवस्थापन प्रणाली आहे जी जुन्या इमारतीच्या तुलनेत ३०% पर्यंत वीज बचत करते. येथे आधुनिक रेन वॉटर हार्वेस्टींग आणि वॉटर रिसायकलींग युनिट बसविण्यात आले आहेत तसेच शून्य कचरा धोरणाअंतर्गत आधुनिक कचरा विल्हेवाट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. नविन संसद भवनात मध्यभागी एक 'फौको पेंडुलम'बसविण्यात आले आहे जे पृथ्वीच्या स्वतःभोवती फिरण्याच्यागतीचे तांत्रिकदृष्ट्या प्रात्यक्षिक दाखविते. हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या दृष्टीने भारताची जिज्ञासा दर्शविते.

नविन संसद भवन हे 'मेक इन इंडिया'आणि 'आत्मनिर्भरभारत' या दोन संकल्पनांचे जिवंत उदाहरण आहे. परदेशी साहित्यावर अवलंबून न रहाता आपल्याच देशातील साधनसामग्री, बुध्दिमत्ता आणि हातांची कला वापरून भारताने हे सिद्ध केले आहेकी देश आज प्रत्येक क्षेत्रात स्वयंपूर्ण आणि सक्षम आहे. नविन संसद भवन हे केवळ सिमेंट, विटा आणि स्टिलची रचना नसुन ती भारताच्या उज्वल भविष्याची आणि अभियांत्रिकी सामर्थ्याची पायाभरणी आहे. वास्तुकलेचा वारसा जपताना अत्याधुनिक सिव्हील इंजिनियरींग तंत्रज्ञानाचा करता उत्तम वापर करता येतो याचे हे सर्वोतम उदाहरण आहे. आधुनिक सिव्हील इंजिनियरींगचे तंत्र आणि भारताच्या कान्याकोपऱ्यातील अस्सल पारंपारीक साहित्य यांचा हा सुरेख मेळ येत्या अनेक शतकांसाठी देशाच्या प्रगतीचा साक्षीदारठरणार आहे.


नविन संसदभवन हे आज केवळ भारतीय राजकारणाचे केंद्र राहिलेले नाहीतर ते जगातील महत्वाच्या मुत्सुदद्देगीरीचे एक नवीन व्यासपीठ बनले आहे. भारत भेटीवर येणारे जगभरातील सर्वोच्च नेते, राजनैतिक प्रतिनिधी आणि परदेशी पाहुणे आवर्जुन या अत्याधुनिक वास्तुची पहाणी करतात आणि भारतीय लोकशाहीच्या भव्यतेचा अनुभव घेतात. या वास्तुची सफर भारताची तांत्रिक आणि आर्थिक प्रगती जगासमोर मांडते.

या वास्तुच्या मागे एका प्रतिभावान वास्तुविशारदाची दूरदृष्टी आणि अथक परीश्रम लपलेले आहेतते म्हणजे पदमश्री पुरस्कार विजेते गुजरात चे आर्किटेक्ट विमल पटेल. त्यांना वास्तुकला आणि शहरी नियोजनाचा दशकांचा अनुभव आहे.

आमचे संपूर्ण संसद भवन पाहुन झाल्यानंतर आम्हाला व्ही आय पी डायनींग हॉलमध्ये अल्पोपहार करण्यासाठी नेण्यात आले. ज्या हॉल मध्ये पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, सर्व मंत्री, खासदार एकत्रीतपणे भोजन आदीचा आस्वाद घेतात त्याच हॉल मध्ये त्याच टेबलवर बसून अल्पोपहार घेणे ही आमच्यासाठी आयुष्यातील एकमेवाद्वितीय घटना होती. तेथील कर्मचारी, अंतर्गत सजावट, खाद्यपदार्थांची रेलचेल, त्यांची विनम्र सेवा सर्व काही आश्चर्यचकित करणारे होते. त्यादीवशी तर संसदभवन आतुन बघुनच पोट भरले होते पण तरीही महनीय व्यक्ति बसणाऱ्या भोजनशालेत आम्ही देखिल अल्पोपहार घेण्याचा आनंद घेतला आणि प्रत्येक क्षणाच्या आठवणी मनात साठविण्याचा प्रयत्न केला.

नविन संसदभवनला भेट देणे हा काही केवळ एक पर्यटन दौरा नसूनतो एका मोठ्या प्रवासाचा साक्षीदार होण्याचा मान आहे. कडक सुरक्षा प्रक्रिया पार करून या संकुलात जेव्हा एखादा नागरिक प्रवेश करतोतेव्हा त्याला भारतीय लोकशाहीच्या अथांग इतिहासाचा आणि आधुनिक भविष्याचा एकाचवेळी प्रत्यय येतो. या वास्तुला भेट दिल्यानंतर मनावर जो प्रभाव पडतो तो शब्दात सांगणे खरोखरच कठीण आहे. हा अनुभव प्रत्येकाच्या मनात देशाबद्द्लचा आदर, प्रेम, आणि भविष्याबद्दलचा अफाट आत्मविश्वास निर्माण करतोजो आयुष्यात कधीही विसरता येत नाही. आम्ही अशाच मिश्र भावनांचे गाठोडे सोबत घेऊन जड अंतकरणाने नवीन संसद भवनाच्या संकुलातुन बाहेर पडलो.

आपल्या देशाची ही प्रगती आणि लोकशाहीचा हा वारसा पाहण्याचे भाग्य मला मिळाले यासाठी मी खरोखर कृतार्थ झाले आहे.



**संकलन आणि शब्दांकन**
**आर्किटेक्ट कविता सुशील जैन**
B. Arch. AIIA, AIID
**अहिल्यानगर**
**फोन – ९८५०३३०५९१**

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# श्रावण मास निमित्त ६ सप्टेंबर रोजी जिव्हेश्वर शिवालयात विविध कार्यक्रम

नगर – सावेडी येथील गावडे मळा, आर्ट ऑफ लिव्हिंग समोर, पाईप लाईन रोड येथील जिव्हेश्वर शिवालय मंदिरात श्रावण महिन्याच्या निम्मिताने सलग ४ थ्या वर्षी स्व.श्रीनिवास जयकुमार कनोरे यांच्या प्रेरणेने धार्मिक व सामाजिक उपक्रम ६ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजन वैभव आहेर यांनी दिली

जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळाच्या या मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे पवित्र श्रावण मास निमित्त सकाळी अभिषेक नंतर राधिका ग्रुप (महिला मंडळ) भजन सकाळी १० वा वृक्षारोपण कार्यक्रम सकाळी ११ वा.नंतर आरती व महाप्रसाद दुपारी १२ वा.होणार आहे यावेळी प्रमुख आकर्षण बाबा बर्फानी अमरनाथ (भव्यदिव्य बर्फाचे शिवलिंग) असणार आहे

महाप्रसाद (अन्नदाते) सुखदेव शेडाळे, मंगल राजेन्द्र शेडाळे, श्रध्दा राजेंद्र शेडाळे, शिवजीत बलभिमराव डोके हे आहेत तर विशेष सहकार्य श्रीमती निलिमा कनोरे, मृणाल कनोरे, अध्यक्षा, जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ, मंदा पिंपरकर, सोमनाथ खाडे, प्रकाश मारवाडे यांचे आहे.

यावेळी आ. संग्राम जगताप, नगरसेवक संपत बारस्कर, विजय श्रीधर पुंडे (गुरुजी), संजय झिंजे, संदिप दातरंगे, सुनिल त्र्यंबके, सागर मुर्तडकर, डॉ. सागर बोरुडे, चंद्रकांत शेळके, महेश कांबळे, कुलदिप भिंगारदिवे, अमित खामकर, रोशनी त्र्यंबके, किरणताई बारस्कर, छायाताई राजपुत दिवाणे, स्नेहल कौसल्या, बाबासाहेब गेरंगे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे.

स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळ,भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर (दिल्लीगेट), स्वकुळसाळी महिला मंच, जय जिव्हेश्वर प्रतिष्ठान, जिव्हाळा प्रतिष्ठान, माता अंकिनी दशांकिनी महिला मंडळ, नर्मदेश्वर महादेव मंदिर, श्री बेलेश्वर ग्रुप, मनोहर कलेक्शन, कापड बाजार यांचे सहकार्य आहे. सर्व भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक श्री व सौ. वैभव संभाजी आहेर, युवक अध्यक्ष, पुजारी व जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळ, सावेडी यांनी केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# मानवीय अवतारात सर्वोत्तम शिक्षक – श्रीकृष्ण



हसरा लाजरा श्रावणही बहरत असतो. निसर्ग सुद्धा चैतन्याची हिरवी वस्त्रालंकार लेऊन सज्ज असतो आणि अशातच अष्टमीला अधर्माचा नाश करण्यासाठी साक्षात सृष्टीचे पालनकर्ता महाविष्णू हे श्रीकृष्णाच्या अवताराने अवनीवर येतात. युग बदलानंतर बदलत्या नात्यानुरूप एक काळ वेळाप्रमाणे श्रीकृष्णाचे जीवन आहे.

कालच कृष्णजन्माष्टमी झाली. आज गोपाळकाला व दहीहंडीच्या सार्वजनिक उत्सवाने काही ठिकाणी अध्यात्म व कृष्ण स्मरणाने या उत्सवाला अधिकच भरती येईल. आता तर पुण्या मुंबईसह बहुसंख्य ठिकाणी दहीहंडीचा मोठा इव्हेंट केला जातो मुलांसह युवा मंडळी आणि आता महिलांचा ग्रुप सुद्धा सात आठ थर लिलया उभ्या करतात. त्यांना मिळू शकणारी रोच बक्षीसही लक्षणीय असतात. प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी प्रायोजक व नेते मंडळीही या इव्हेंटचे भांडवल करून घेतात. अर्थात यात गैर काही नाही. काळाचा महिमा!

योगायोगाने आज ५ सप्टेंबर म्हणजे शिक्षक दिन आणि जाणकारच काय प्रत्येक चिंतनशील भारतीय मानेल की श्रीकृष्ण हा सर्वोत्तम व मानवी अवतारातील एक आदर्श शिक्षकच आहे. त्याचे जीवन आभालवृद्धांना जीवन जगण्याचे धडे शिकवते. उपदेश देते.

खरं तर श्रीकृष्णाचे अवघे जीवन संकटांनी भरलेले होते हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे. कारागृहात जन्म देणाऱ्या माता–पित्यांपासून दुरावा, बालपणीच मारु इच्छिणारी पुतना, बलाढ्य कंस, ग्वालांसह खेळतानाचा कालियामर्दन, गोकुळाला भयानक पर्जन्य पासून वाचवणारे गोवर्धन धारण सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे पांडवांचे रक्षण मार्गदर्शन करतानाचे प्रवीण व कुशल धडे आपल्याला खूप काही करतानाचे आपल्याला खूप काही सांगते. पण आलेली सर्व अडचणी, समस्या त्याने कर्मसिद्धांताने हाताळली. एका सक्षम शिक्षकासम त्याने कर्म सिद्धांताने हे का सक्षम शिक्षका सम त्याने जीवनाकडे निरपेक्ष भावनेने पाहण्यास व जीवनकार्य करण्यास सांगितले.

आता पुन्हा आजच्या दहीहंडी उत्सवाकडे येऊ. खरंतर गणेशोत्सवाप्रमाणे हा सुद्धा सार्वजनिक आणि आनंदाचा महाउत्सव आहे. येथेही अबालवृद्ध एकत्र येऊन श्रद्धेने हा उत्सव साजरा करतात. म्हणूनच या दोन्ही उत्सवी सणांना समाजाच्या दृष्टीने जास्तीत जास्त विधायक प्रबोधनात्मक रितीने वळण लागल्यास सार्वजनिक शांती, आनंद व समजूत वाढीस लागेल.

दहीहंडीतील सर्व सहभाग घेणारे गोविंदा टीमवर्कचा सर्वात मोठा संदेश देतात. गोपाळकाल्यातून गोविंदा मित्र सवंगड्यांसह एकत्र येणे, निरपेक्ष मजा करणे तन मनाला प्रफुल्लित करण्याचा भाव दाखवतात.

दहीहंडी फोडू इच्छिणारे व फोडणारे सगळेच शूरवीर गोविंदा त्यातल्या मुले मुली योग्य नियोजनाचा मार्ग दाखवतात. एकमेकांच्या सहकार्याने जीवनात प्रगतीचे, इशाचे उंचच उंच थर कसे उभारायचे हे दर्शवतात. गणेशोत्सवाप्रमाणे या महादहीहंडी उत्सवात श्रीकृष्णाचे विविध जीवन प्रसंग, त्यातील संदेश, त्यातून घेता येणारी नीती हे सांगितले गेले पाहिजे. प्रसिद्धीसाठी सेलिब्रिटीज प्रमाणे बाळकृष्ण, राधेचा कृष्ण, युद्धभूमीवरील कृष्ण, द्वारकेचा निर्माता कृष्ण इत्यादी वेशात नव्या पिढीला सादर केले तर २झी पिढीलाही भारतीय परंपरा संस्कृतीची जाणीव होईल. यासाठी सर्व तरुण मंडळांना पुढे यावे लागेल.

कर्मयोगाचा सर्वोच्च सिद्धांत मांडणाऱ्या श्रीकृष्णाचे अवघे जीवनच अभ्यासनीय अनुकरणीय आहे म्हणूनच यानिमित्त येणाऱ्या गणेशोत्सवात प्रसिद्धी माध्यमात या गोष्टींची किमान चर्चा व्हावी या हेतूने हा लेख प्रपंच अध्यात्मिक धार्मिक अधिष्ठान असलेल्या आपल्या सण उत्सव परंपरेत घुसलेला डीजेचा आवाज कमी होऊन इतर भ्रष्टाचार दूर होऊन खरा आनंद मिळावा हीच अपेक्षा नाही तर संभवामी युगु युगे... पुन्हा एकदा अवताराची प्रतिक्षा...

– **किशोर गांधी** (दिशान फिचर्स)




# जगभरात ८४ कोटींना मूत्रपिंड विकार


आरोग्य वार्ता

जगभरात सुमारे ८४.४ कोटी नागरिकांना दीर्घकालीन मूत्रपिंड विकार (सिकेडी) असल्याचा अंदाज आहे; मात्र यापैकी जवळपास अर्ध्या रुग्णांचे निदानच झालेले नाही, असा धक्कादायक निष्कर्ष वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित 'द लॅन्सेट' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या नव्या अभ्यासातून समोर आला आहे. त्यामुळे हा आजार 'सायलेंट किलर' ठरत असून, वेळेत निदान न झाल्यास लाखो रुग्ण गंभीर अवस्थेत पोहोचण्याची शक्यता आहे.

अभ्यासानुसार, मूत्रपिंडाच्या आजाराची सुरुवातीची लक्षणे फारशी जाणवत नसल्याने अनेक रुग्णांना आजाराची माहिती अंतिम टप्प्यातच मिळते. त्या वेळी मूत्रपिंडाची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात कमी झालेली असते आणि डायलिसिस किंवा प्रत्यारोपणाशिवाय पर्याय राहत नाही. विशेषतः भारतासह कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये तपासणीची मर्यादित उपलब्धता, आरोग्याविषयी अपुरी जागरूकता आणि नियमित आरोग्य तपासणीचा अभाव यामुळे निदानाचे प्रमाण अत्यंत कमी असल्याचे संशोधनात नमूद करण्यात आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि वाढते वय ही मूत्रपिंड विकाराची प्रमुख कारणे आहेत. या जोखीम गटातील व्यक्तींनी नियमित रक्त व लघवीच्या तपासण्या करून घेणे अत्यावश्यक आहे. सुरुवातीच्या टप्प्यात आजार ओळखल्यास औषधोपचार, जीवनशैलीतील बदल आणि योग्य वैद्यकीय सल्ल्याद्वारे मूत्रपिंडाचे नुकसान मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकते. भारत ही मधुमेहाची राजधानी बनली असून आजही कोट्यवधी लोकांना उच्चरक्तदाबाचा त्रास आहे अथवा नाही याची एकतर कल्पना नाही तसेच औषध घेण्याबाबत ते उदासीन असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. संशोधकांनी सरकारे आणि आरोग्य यंत्रणांना प्राथमिक आरोग्य सेवांमध्ये मूत्रपिंड विकाराच्या तपासणीचा समावेश करण्याचे आवाहन केले आहे. तसेच मधुमेह आणि रक्तदाब तपासणीसोबतच मूत्रपिंडाच्या कार्यक्षमतेची नियमित चाचणी उपलब्ध करून देणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.


जागतिक स्तरावर मूत्रपिंड विकारामुळे मृत्यू आणि अपंगत्वाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. उपचारांचा वाढता खर्च, डायलिसिस केंद्रांची अपुरी संख्या आणि प्रत्यारोपणासाठी अवयवांची कमतरता ही अनेक देशांसमोरील मोठी आव्हाने आहेत. त्यामुळे प्रतिबंध, लवकर निदान आणि वेळेवर उपचार यांवर भर देणे हीच परिस्थिती सुधारण्याची प्रभावी दिशा असल्याचे अभ्यासात नमूद करण्यात



आले आहे. सर्वसामान्यांनी पुरेसे पाणी पिणे, रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवणे, वेदनाशामक औषधांचा अतिरेक टाळणे, संतुलित आहार घेणे आणि नियमित आरोग्य तपासणी करणे यांसारख्या सवयी अंगीकारल्यास मूत्रपिंड विकाराचा धोका लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो.

# हिपॅटायटीस ठरू शकतो जीवघेणा

व्याधी विचार



हिपॅटायटीस हा एक आजार आहे. त्यात यकृताला सूज येते आणि कधीकधी तो प्राणघातक ठरू शकतो. ही सूज सहसा विषाणूमुळे होते; परंतु अल्कोहोल, खाण्याच्या चुकीच्या सवयी, काही औषधे हीदेखील त्यामागील कारणे असू शकतात.

लोक या आजाराबद्दल अनेकदा गोंधळलेले असतात. हिपॅटायटीस म्हणजे यकृतात सूज येणे. ही सूज विषाणूमुळे होते आणि वेळेवर उपचार न केल्यास यकृत निकामी होणे, यकृताचा कर्करोग यासारखे गंभीर आजार होऊ शकतात. हिपॅटायटीसचे ५ मुख्य प्रकार आहेत ज्यात ए, बी, सी, डी आणि ई यांचा समावेश आहे; परंतु यापैकी हिपॅटायटीस बी आणि सी सर्वात धोकादायक मानले जातात. कारण ते शरीरात बराच काळ राहतात आणि हळूहळू यकृताचे नुकसान करू शकतात. हिपॅटायटीस कोणालाही होऊ शकतो; परंतु काही कारणांमुळे ते वेगाने पसरते. घाण अन्न, संक्रमित रक्त किंवा सुयांचा वापर, संक्रमित आईपासून बाळापर्यंत किंवा माती यामुळे तो पसरतो.

**हिपॅटायटीसची लक्षणे**

हिपॅटायटीसची लक्षणे सुरुवातीला अगदी सामान्य असू शकतात; परंतु जेव्हा तो गंभीर होतो, तेव्हा थकवा आणि अशक्तपणा, भूक न लागणे, पोटदुखी किंवा सूज, उलट्या किंवा अतिसार, गडद रंगाचा मूत्र, कावीळ आणि ताप अशी लक्षणे दिसतात. कधीकधी हा आजार कोणत्याही लक्षणांशिवायदेखील होऊ शकतो आणि हळूहळू यकृताचे नुकसान करत राहतो. म्हणून, वेळोवेळी तपासणी करणे महत्वाचे आहे.

# पोटदुखीकडे दुर्लक्ष नको

जाणून घ्या



कोलन कॅन्सर मोठ्या आतड्यात सुरू होतो. हा जगभरातील सर्वात सामान्य कर्करोगांपैकी एक आहे. दरवर्षी लाखो लोक या कर्करोगामुळे मरतात; परंतु मोठ्या आतड्याच्या कर्करोगाची लक्षणे लवकर ओळखल्यास, वेळेवर उपचार सुरू करता येतात आणि जीव वाचवता येतो. त्यामुळे, मोठ्या आतड्याच्या कर्करोगाची लक्षणे समजून घेणे आणि त्याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

बहुतेक लोक याला पोटदुखी समजून दुर्लक्ष करतात. ही लक्षणे लवकर ओळखली गेली, तर त्यावर वेळेत उपचार करता येतात. वारंवार पोटदुखी, गॅस, पोट फुगणे किंवा पेटके येत असतील तर या या समस्या दीर्घकाळ राहतात. त्यामुळे तपासणी करणे गरेजेचे आहे, हे मोठ्या आतड्यात अडथळा असल्याचे लक्षण असू शकते. मोठ्या आतड्याच्या कर्करोगाच्या लक्षणांमध्ये बऱ्याचदा शौचानंतर पोट पूर्णपणे रिकामे न वाटणे. शौच पूर्णपणे बाहेर नसल्यास किंवा शौचालयाला जाण्याची गरज भासणे हेदेखील मोठ्या आतड्यातील समस्येचे लक्षण आहे.

अनेक दिवस किंवा आठवड्यांपर्यंत तुमच्या शौचाच्या सवयींमध्ये बद्धकोष्ठता किंवा वारंवार जुलाब होणे, यासारखे बदल सतत जाणवत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. हे मोठ्या आतड्याच्या कर्करोगाचे (कोलन कॅन्सरचे) प्रारंभिक लक्षण असू शकते. आहारात किंवा व्यायामाच्या नित्यक्रमात कोणताही बदल केला नसेल, तरीही वजन झपाट्याने कमी होत असेल, तर हे मोठ्या आतड्याच्या कर्करोगासारख्या (कोलन कॅन्सर) गंभीर वैद्यकीय स्थितीचे लक्षण असू शकते. काही बदल जाणवल्यास, त्याकडे दुर्लक्ष करू नका.

# महिलांमध्ये खाज येण्याचे प्रमाण अधिक

आरोग्य विशेष



त्वचेला खाज येण्याची अनेक कारणे आहेत. रजोनिवृत्तीच्या काळात त्वचेमध्ये नैसर्गिक तेलाची निर्मिती कमी होते. त्यामुळे त्वचा कोरडी पडून तिची जळजळ किंवा आग होऊ शकते. गर्भावस्थेतही खाज येणे सामान्य आहे. यामध्ये हार्मोन्समधील बदलांची महत्त्वाची भूमिका असते. तसेच पोटाचा आकार वाढत असताना पोटाभोवतीची त्वचा ताणली जाते. त्यामुळे ती कोरडी पडून खाज सुटू शकते; परंतु रात्री झोपेत असताना खाज येत असेल तर त्याचे नेमके कारण काय असू शकते?

दिवसभर आपण विविध कामांमध्ये व्यग्र असल्यामुळे त्वचेला येणाऱ्या सौम्य खाजेकडे फारसे लक्ष जात नाही; मात्र रात्री शांत वातावरणात आणि झोपताना शरीरावरील संवेदनांकडे अधिक लक्ष जाते. खोलीत उष्णता अधिक असणे, जाड पांघरूण, घाम येणे आणि त्वचेचा कोरडेपणा यामुळेही रात्री खाज अधिक तीव्र जाणवू शकते. त्यामुळे झोपताना वारंवार खाज येत असेल, तर केवळ पांघरूण किंवा हवामानाला दोष न देता त्यामागील कारण शोधणे आवश्यक आहे.


रात्री तीव्र होणारी खाज हे खरूज अर्थात 'स्केबीज'चे महत्त्वाचे लक्षण आहे. हा त्वचेचा संसर्ग अतिशय सूक्ष्म परजीवी किड्यामुळे होतो. बोटांच्या बेचक्यांत, मनगटांवर, काखेत, कंबरेभोवती, नितंबांवर किंवा जननेंद्रियांच्या परिसरात बारीक पुरळ, फोड किंवा रेषांसारख्या खुणा दिसू शकतात. घरातील व्यक्तींना एकाच वेळी रात्री खाज येत असल्यास खरूजेची शक्यता लक्षात घ्यावी. खरूज त्वचेच्या निकट संपर्कातून तसेच बाधित व्यक्तीचे कपडे, टॉवेल किंवा अंथरूण वापरल्याने पसरू शकते. त्यामुळे केवळ एका व्यक्तीने उपचार न घेता डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार जवळच्या संपर्कातील व्यक्तींनाही उपचारांची आवश्यकता भासू शकते.

नवीन साबण, परफ्यूम, बॉडी लोशन, केसांचा रंग, कपडे धुण्याची पावडर किंवा विशिष्ट प्रकारच्या कपड्यांमुळे त्वचेची ॲलर्जी अथवा 'कॉन्टॅक्ट डर्मटायटिस' होऊ शकतो. काही औषधांमुळेही खाज किंवा पुरळ येण्याची शक्यता असते. त्यामुळे खाज नेमकी कधी सुरू झाली, त्यापूर्वी कोणते नवीन उत्पादन किंवा औषध वापरले होते आणि शरीराच्या कोणत्या भागावर ती अधिक आहे, याची नोंद ठेवावी; मात्र डॉक्टरांचा सल्ला न घेता कोणतेही नियमित औषध अचानक बंद करू नये.

गर्भावस्थेत त्वचा ताणल्यामुळे खाज येऊ शकते; मात्र विशेषतः हातांच्या किंवा पायांच्या तळव्यांना पुरळ नसताना तीव्र खाज येत असेल आणि ती रात्री वाढत असेल, तर तातडीने स्त्रीरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. अशी खाज काही वेळा 'इंट्राहेपॅटिक कोलेस्टेसिस ऑफ प्रेग्नन्सी' या यकृताशी संबंधित विकाराचे लक्षण असू शकते. या स्थितीत आईबरोबरच गर्भाच्या आरोग्याचेही वैद्यकीय निरीक्षण आवश्यक असते.

# पावसाळ्यात वाढतो सांधेविकार

ऋतुचक्र



पावसाळा सुरू होताच अनेकांना गुडघेदुखी, सांधे आखडणे, खांदे दुखणे, बोटांमध्ये कडकपणा आणि कंबरेचा त्रास जाणवू लागतो. विशेषतः संधिवात (आर्थ्रायटिस) किंवा जुनाट सांध्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या रुग्णांमध्ये हा त्रास अधिक तीव्र होऊ शकतो. पावसाळा हा थेट संधिवातास कारणीभूत नसला, तरी वातावरणातील बदलांमुळे आधीपासून असलेली वेदना आणि स्नायूंचा कडकपणा आणखी वाढू शकतो.

मॉन्सूनमध्ये हवेत आर्द्रता वाढते आणि वातावरणातील दाबात बदल होतात. वातावरणातील दाब कमी झाल्याने सांध्यांभोवतीच्या ऊतींमध्ये किंचित सूज येऊ शकते. त्यामुळे संवेदनशील मज्जातंतूंवर अतिरिक्त दाब पडतो आणि त्यामुळे वेदना किंवा स्नायूंमधील कडकपणा वाढू शकतो. थंड आणि दमट हवामानामुळे स्नायू व स्नायुबंधामध्ये ताठरता येते. त्यामुळे विशेषतः सकाळी उठल्यानंतर किंवा बराच वेळ एकाच जागी बसल्यावर सांधे अधिक आखडल्यासारखे वाटतात.

पावसाळ्यात बऱ्याचदा घराबाहेर पडणे टाळले जाते. त्यामुळे चालणे, व्यायाम किंवा शारीरिक हालचाल कमी झाल्याने सांध्यांची लवचिकता कमी होते आणि संधिवाताची लक्षणे अधिक तीव्र होऊ शकतात. विशेषतः ऑस्टिओआर्थ्रायटिस, रुमॅटोइड आर्थ्रायटिस, जुन्या दुखापती किंवा दीर्घकालीन पाठदुखी असलेल्या व्यक्तींना पावसाळ्यात अधिक त्रास जाणवण्याची शक्यता असते.

**सांधेदुखीवर नियंत्रण ठेवण्यासाठी...**

* नियमित शारीरिक हालचाल करा आणि हलका व्यायाम, स्ट्रेचिंग किंवा घरच्या घरी करता येणारे व्यायाम करा. * एकाच जागी दीर्घकाळ बसणे टाळा. ठराविक वेळेने उठून चाला. *वजन नियंत्रणात ठेवा. अतिरिक्त वजनामुळे सांध्यांवर अधिक ताण येतो. * आहारात कॅल्शियम आणि व्हिटॅमिन-डी यांचा समावेश असलेला संतुलित घ्या. * हवामान थंड असले तरी पुरेसे पाणी प्या आणि शरीर हायड्रेट ठेवा. * डॉक्टरांनी दिलेली औषधे आणि फिजिओथेरपी नियमित सुरू ठेवा. * सांध्यांचा कडकपणा कमी करण्यासाठी गरम पाण्याची पट्टी ठेवून शेक द्या तसेच कोमट पाण्याने अंघोळ करा.

**वेळेवर उपचार महत्त्वाचे**

सांधेदुखी किंवा संधिवाताचा त्रास वारंवार वाढत असेल, सांधे सुजत असतील किंवा दैनंदिन कामांमध्ये अडथळा येत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. योग्य उपचार, नियमित व्यायाम आणि तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास पावसाळ्यातही सांधेदुखी आणि स्नायुंचा कडकपणा प्रभावीपणे नियंत्रणात ठेवता येतो.

# प्रभावी मध आणि दालचिनी

आयुर्वेद आणि विकार



मध आणि दालचिनी हे घटक जवळपास प्रत्येक घरात आढळतात. या दोहोंमध्ये औषधी गुणधर्म आहेत. आयुर्वेदानुसार या दोन्ही घटकांच्या एकत्रिकरणाने अधिक परिणाम साधला जातो. पोटदुखीपासून रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापर्यंत अनेक विकारांवर, व्याधींवर प्रभावी औषध म्हणून दालचिनी आणि मधाच्या मिश्रणाचा वापर करता येईल.


* मुरुमांची समस्या दूर करण्यासाठी मध आणि दालचिनीचा लेप तयार करून चेहऱ्याला लावता येईल. तीन चमचे मधात एक चमचा दालचिनीची पूड घालून हा लेप तयार करता येईल. हा लेप रात्री झोपण्याआधी मुरुमांवर लावा. सकाळी धुवून टाका. त्वचेशी संबंधित अनेक समस्यांवर हा रामबाण उपाय ठरू शकतो.

* मध आणि दालचिनीच्या सेवनामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढून विविध विकारांना आळा बसू शकतो. या दोन्ही घटकांमध्ये भरपूर अँटीऑक्सिडंट्स आणि बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. पचनशक्ती सुधारण्यासाठीही या मिश्रणाचा वापर करता येईल. यामुळे पोटाशी संबंधित समस्या दूर होऊ शकतील.

* आर्थ्रायटिसच्या वेदनांवर मात करण्यासाठी दालचिनी आणि मधाचं एकत्रित सेवन करता येईल. कोमट पाण्यात मध आणि दालचिनीची पूड घालून लेप तयार करा. हा लेप प्रभावित भागावर लावा. आराम मिळेल.

# जबडा 'लॉक' होतोय?

आरोग्यमंत्र



जबडा 'लॉक' झाल्यावर आजूबाजूचे स्नायू संरक्षणात्मक मोडमध्ये जातात आणि आकुंचन पावतात. अशा वेळी व्यक्ती घाबरल्यास शरीरात स्ट्रेस हार्मोन्स वाढतात. त्यामुळे स्नायू आणखी घट्ट होतात आणि जबडा पूर्वस्थितीत येण्यास आहे तसा होण्यास कठीण होते. जबडा लॉक झाल्यास शांत राहा. सर्वात आधी स्वतःला शांत करा, जेणेकरून स्नायूंवरील ताण कमी होईल.

जबड्याच्या दोन्ही बाजूंना १५ ते २० मिनिटे गरम आणि ओलसर कपड्याने किंवा पॅडने शेका. जास्त ताण न देता जबडा डावीकडे-उजवीकडे किंवा अगदी हळूहळू वर-खाली करण्याचा प्रयत्न करा. वेदना वाढल्यास लगेच थांबून जा.

पुढील काही दिवस खिचडी किंवा सूप सारखे मऊ पदार्थ खा आणि जास्त मोठे तोंड उघडणे टाळा. जर जबडा काही मिनिटांत किंवा तासाभरात पूर्वस्थितीत आला नाही, तीव्र वेदना होत असतील, सूज आली असेल, किंवा श्वास घेण्यास व गिळण्यास त्रास होत असेल, तर घरगुती उपाय न करता लगेच डॉक्टरांचा किंवा डेंटिस्टचा सल्ला घ्यावा.

मोबाईल किंवा लॅपटॉप वापरताना मान पुढे झुकवून बसण्याची चुकीची पद्धत, सतत ताण घेतल्यामुळे दात चघळणे, सतत च्युइंग गम चघळणे आणि नखे चावणे या सवयींमुळे जबड्यावर अतिरिक्त ताण पडतो. योग्य पोश्चर राखणे, ताण कमी करणे आणि जबड्याला विश्रांती देणे यांमुळे हा त्रास टाळता येऊ शकतो.

# प्रसूतीनंतरचं आहारतंत्र

काय खावं?



गर्भधारणेनंतर तसंच प्रसूतीनंतर महिलांना बऱ्याच शारीरिक आणि मानसिक बदलांना सामोरं जावं लागतं. या काळात शरीराची बरीच झीजही होते. त्यातही नोकरी-व्यवसाय करणाऱ्या महिलांना ही दुहेरी जबाबदारी सांभाळताना बरीच कसरत करावी लागते. म्हणूनच महिलांनी प्रसूतीनंतर पोषक आहार घ्यायला हवा. प्रसूतीनंतरच्या आहारतंत्राविषयी...

* आहारात ताजी फळं आणि भाज्यांचा समावेश असावा. तुमच्या जेवणाचं अर्धं ताट ताजी फळं आणि भाज्यांनी भरलेलं हवं. त्यातही हिरव्या पालेभाज्यांचा अधिक समावेश करायला हवा तर उर्वरित अर्ध्या भागात ओट्स, हातसडीच्या तांदळाचा भात, गव्हाचा ब्रेड, पोळ्या अशा पूर्ण धान्याचा समावेश असावा.

* शरीराची कॅल्शियमची गरज भागवण्यासाठी आहारात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करा. दूध, दही, पनीर असे पदार्थ खा.

* या काळात जंक फूड, प्रक्रिया केलेले, खारवलेले, तळलेले पदार्थ खाऊ नका. मधल्या वेळची भूक भागवण्यासाठी एखादं फळ, सुका मेवा, चणे, शेंगदाणे अशा आरोग्यदायी पदार्थांची निवड करा.

* प्रसूतीनंतर शरीराला लोह आणि फॉलिक ॲसिडची गरज असते. टोमॅटो, आवळा, मोड आलेली कडधान्यं, सुका मेवा, अंजीर, मनुका, गूळ, बीट ,भेंडी, पालक, गाजर, चिकन अशा पदार्थांमधून या पोषक घटकांची गरज भागू शकते.

* कॉफी, कार्बनयुक्त पेयांचं प्रमाण कमी करा. मद्यपानही टाळा.

* गरोदरपणात वाढलेलं वजन कमी करण्यासाठी लगेच डाएट करू नका. या काळात झालेली झीज भरून काढण्यासाठी शरीराला पुरेसा वेळ द्या. शास्त्रीय पद्धतीने आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने वजन कमी करा.

नवसंशोधन

## शाकाहार ठरतो लाभदायी

शाकाहारामुळे मूत्रमार्गाच्या जंतूसंसर्गाचा धोका कमी होत असल्याची बाब एका संशोधनातून समोर आली आहे.



ई कोलाय सारख्या बॅक्टेरियामुळे मूत्रमार्गाचा जंतूसंसर्ग उद्भवतो. हा बॅक्टेरिया मूत्रमार्गात प्रवेश करून मूत्रपिंड तसंच ग्रंथींचं नुकसान करतो. तैवानमधल्या एका संस्थेत याबाबतचं संशोधन करण्यात आलं आहे. 'सायंटिफिक रिपोर्टस' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे.

दंतारोग्य

## दातांमध्ये फटी असतील तर...



तुमच्या दोन दातांच्या मध्ये मोठ्या फटी असतील तर अधिक काळजी घ्यायला हवी. या फटींमध्ये अडकलेले अन्नकण कुजून तोंडाला दुर्गंधी येऊ शकते. दात घासणं तसंच फ्लॉसिंग म्हणजे दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढण्यासोबतच इतरही उपायोजना करायला हव्यात. दातांच्या फटींमध्ये जाऊन अन्नकण स्वच्छ करणारी काही उपकरणं उपलब्ध आहेत. या उपकरणांचा वापर करून प्लाकच्या निर्मितीला आळा घालता येतो.

जपणूक त्वचेची

## टाळा त्वचेचं नुकसान



व्यायाम केल्यानंतर अनेकांच्या चेहऱ्यावर मुरुमं, पुटकुळ्या येतात. घाम, धूळ, घाणीमुळे असं होऊ शकतं. जीममध्ये व्यायाम करत असाल तर उपकरणं वापरण्याआधी ती नीट पुसून घ्या. व्यायाम करताना केस नीट बांधून घ्या. घामाचे हात वारंवार चेहऱ्याला लावू नका. व्यायामानंतर आंघोळ करा. घामेजलेले कपडे बदला. घामाच्या कपड्यांमध्ये फार काळ राहू नका. व्यायामाला जाताना ढगळ कपडे घाला. व्यायामादरम्यान चेहऱ्यावर कोणताही मेक अप नसावा.

आजीबाईचा बटवा

## केसांचं गळणं थांबवण्यासाठी...

केस गळण्याची समस्या खूपच त्रासदायक ठरू शकते. केस गळण्यावर वेळेत उपाय केले नाहीत तर टक्कलही पडू शकतं.



काही घरगुती उपायांनी केस गळण्यावर नियंत्रण मिळवता येतं. कांद्याचा रस लावल्यामुळे केस गळणं थांबू शकतं. कांदा किसून त्याचा रस काढा. हा रस टाळूला लावा. दोन तासांनी केस धुवून टाका. हा उपाय आठवड्यातून दोन ते तीन वेळा करा. यामुळे बराच लाभ होईल. ग्रीन टीमुळेही केस गळणं थांबू शकतं. थोडा ग्रीन टी पाण्यात उकळून घ्या. हे पाणी टाळूवर लावा. तासाभराने केस धुवून घ्या.

# सारसनगरमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव व संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सव उत्साहात

## ज्ञानेश्वरी पारायण, शिवलीलामृत पारायण व कीर्तन सोहळ्याने भक्तिमय वातावरण

नगर – सारसनगर येथील राधाकृष्ण मंदिराच्या वतीने श्रीकृष्ण जन्मोत्सव तसेच संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, शिवलीलामृत पारायण, हरिपाठ, भजन, प्रवचन आणि कीर्तन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक प्रकाश भागानगरे, प्राध्यापक माणिक विधाते, ह.भ.प. प्रभाताई भोंग, ज्ञानदेव पांडुळे, अवधूत फुलसौंदर यांच्यासह भाविक उपस्थित होते.


सारसनगर येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचे उद्घाटन करताना आ. संग्राम जगताप. समवेत इतर मान्यवर.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, महाराष्ट्राची भूमी ही साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून आपल्याला अध्यात्मिकतेचा मोठा वारसा लाभला आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जोपासली जाते. आजच्या युवा पिढीला धार्मिकतेची गोडी निर्माण व्हावी, यासाठी आपले सण–उत्सव धार्मिक आणि पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरे केले पाहिजेत. तसेच ह.भ.प. प्रभाताई भोंग यांच्या माध्यमातून सुसंस्कृत पिढी घडविण्याचे कार्य सुरू आहे, असेही आमदार जगताप यांनी सांगितले. श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त काकड आरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, भजनी मंडळाचा भजन संध्या कार्यक्रम, हरिपाठ, कृष्णलीला चरित्र, कृष्ण जन्मोत्सव तसेच कृष्ण जन्माचे काल्याचे कीर्तन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याशिवाय ह.भ.प. गणेश महाराज बडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन आणि हरिपाठ सोहळा उत्साहात पार पडला. या संपूर्ण धार्मिक सोहळ्याला भाविकांनी उपस्थित राहून श्रीकृष्ण जन्मोत्सव आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्मोत्सवाचा आनंद घेतला. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून परंपरा, संस्कार आणि अध्यात्मिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला.

## गुरुवाणी – ४१



### तीर्थंकरांचा धर्मच परमार्थ

करणे, करून घेणे आणि अनुमोदन या तिन्ही गोष्टींनी आश्रव होतो. धर्माच्या रस्त्याने चालणाऱ्या व्यक्तीसाठी मार्ग प्रशस्त करणे, त्याला पाठबळ देण्याला 'संघ' म्हणतात. यातून संघाचे पुण्य बंध होते व पापाची निर्जरा होते. 'जो होता नही है लेकीन होना चाहिए', असे ध्येय हवे. मोक्ष प्राप्तीसाठी योग्यता व इच्छा असावी लागते. तीर्थंकरांचे उद्दीष्ट स्वतःचा फायदा नसते तर त्यांच्यामुळे वातावरण सकारात्मक बनले पाहिजे हे असते. त्यांची चेतना जिथे कुठे जाते, तेथील संपूर्ण माहोल बदलतो. तीर्थंकर व सामान्य केवली मध्ये खूप फरक असत नाही. फक्त तीर्थंकरांसारखे मन आणि वचन सामान्य केवलीचे नसते. तीर्थंकरांचे वारसा, सिद्धांत, दायित्व, विचार, श्रद्धा, शिकवण जगात पोहचवतो तो त्यांचा उत्तराधिकारी असतो. अशा उत्तराधिकारी, साधक, श्रावकांना ताकद देणाऱ्याला संघ म्हणतात. असा संघ चालवणाऱ्याला पुण्य प्राप्ती होते. ज्या संघात तीर्थंकरांच्या शक्तीचा आश्रव होतो , तो श्री संघ असतो. हे आगममध्येही सांगितले आहे. बिना संघ तीर्थंकरांचे शासन चालू नाही शकत. संघात प्रथम तपस्वी, चारित्र्यसंपन्न, संस्कारींचा आश्रव झाला पाहिजे. श्रद्धाळूंचे संघटन म्हणजे संघ. संघात सुरक्षिततेचा संवरही झाला पाहिजे. सज्जनांसाठी दरवाजा खुला पाहिजे पण मच्छर आत आले नाही पाहिजे, अशी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. आचार्यश्रींच्या पावन भूमीत द्वेष, काटे, विखारी विचार अजिबात यायला नकोत. यासाठी एक आदर्श व्यवस्था निर्माण करावी. याचसाठी यंदाचे पर्युषण पर्व संघ समर्पित करायचे आहे. असा माहोल तयार व्हावा की प्रत्येक जण भक्तीत दंग झाला पाहिजे. ज्याला नाचता येत नाही तो सुद्धा सेवा, दानधर्म, तपस्या, धर्माचरणात नाचला पाहिजे. ज्याच्या भाग्यात नाही त्याला सुद्धा मिळाले पाहिजे अशी व्यवस्था पर्युषण काळात तयार व्हावी. तपस्येची सुरूवात अट्ठाईने झाली की मास खमण होऊ शकते. तशी ताकद मिळते. यासाठी श्रद्धा हवी. तप 'कशाय'ला जिंकण्यासाठी हवं. 'तीर्थंकरांनी सांगितलेला धर्मच परमार्थ आहे, बाकी सर्व अनर्थ आहे'. या अनुभूतीत जगणे यालाच भगवान महावीरांचे श्रावक बनने म्हणतात. याच अनुभूतीचा जागर आपल्याला करायचा आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# मुख्याध्यापक शेख यांना दिल्लीचा 'महात्मा ज्योतीबा फुले राष्ट्रीय फेलोशिप सन्मान' जाहीर

नगर – शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे नागापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांना दिल्ली येथील भारतीय दलित साहित्य अकादमीच्या वतीने देण्यात येणारा महात्मा ज्योतीबा फुले राष्ट्रीय फेलोशिप सन्मान जाहीर झाला आहे. भारतीय दलित साहित्य अकादमीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सोहनपाल सुमनाक्षर यांनी शेख यांना फेलोशिप जाहीर झाल्याचे कळविले आहे.

दिल्ली येथे होणाऱ्या ४२ व्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनात ही फेलोशिप मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. मुख्याध्यापक चाँद हुसेन शेख यांनी शिक्षक म्हणून कार्यरत असताना अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा दिली आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रम राबविले. ते स्वत: एक उत्कृष्ट कुस्तीपटू होते, त्यांनी अनेक खेळाडू देखील घडविले आहे. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे केंद्र असावे, या विचारातून त्यांनी सातत्याने काम केले आहे.

शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. ग्रामस्थांच्या सहकार्याने जिल्हा परिषदेच्या शाळांना पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी ज्या–ज्या गावांमध्ये शिक्षक म्हणून सेवा बजावली, त्या ठिकाणी लोकसहभागातून शाळा विकासाची चळवळ उभी केली. किन्ही, गारखिंडी (पारनेर), दरेवाडी (नगर), हिवरेझरे (नगर), कनोली (संगमनेर), नाचनगाव (अकोले) आणि नवनागापूर (नगर) येथील जिल्हा परिषद शाळांच्या इमारती उभारण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना महात्मा ज्योतीबा फुले राष्ट्रीय फेलोशिप सन्मान जाहीर झाला आहे. या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आनंद तीर्थ समवशरण येथे ८ ते १५ सप्टेंबर दरम्यान पर्युषण पर्व महामंगलकारी अनुष्ठान

## विविध कार्यक्रमांतून भाविकांसाठी धार्मिक व अध्यात्मिक पर्वणी

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषी महाराज यांच्या पावन भूमीत त्यांचे शिष्य अर्हम विज्ञा प्रणेता, उपाध्याय प्रविणऋषी म.सा. यांचा समर्पण चातुर्मास भक्तीमय वातावरणात संपन्न होत आहे. या चातुर्मासात ८ ते १५ सप्टेंबर या कालावधीत पर्युषण पर्वाचे महामंगलकारी अनुष्ठान होणार आहे. यात नित्य प्रवचन, कल्पसूत्र वाचन, प्रतिक्रमण, व्रत नाटिका असे विविध कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी म.सा., उपाध्याय प्रवीणऋषी म.सा., आलोकऋषी म.सा., तिर्थेशऋषी म.सा., सत्यप्रभा म.सा., अमितज्योती म.सा. आदी साधू साध्वीजींच्या पावन सान्निध्यात पर्युषण पर्व अनुष्ठानचे कार्यक्रम आनंद तीर्थ समवशरण येथे होतील. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती व अहिल्यानगरचे सुपुत्र सौरभ हेमराज बोरा, राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

पर्युषण पर्वात ८ ते १५ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळपासून ते रात्रीपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. उपाध्याय दररोज विविध विषयांवरही उद्बोधक मार्गदर्शन होईल.

६ सप्टेंबर रोजी पयुर्षण क्यो?, ७ सप्टेंबर रोजी पर्युषण कैसे मनाये?, ८ सप्टेंबर रोजी खुद का आत्म साक्षात्कार करें, ९ सप्टेंबर रोजी अंतरात्मा को शुद्ध करें, १० सप्टेंबर रोजी स्वयं मजबूत बनें, समाज को सशक्त बनायें, ११ सप्टेंबर रोजी अपने



जीवन के वास्तूकार स्वयं बने, १२ सप्टेंबर रोजी विराम से जुडाव, १३ सप्टेंबर रोजी विश्व से असीम ऊर्जा प्राप्त करे, १४ सप्टेंबर रोजी मित्र बने– मित्र बनाए, १५ सप्टेंबर रोजी संवत्सरी – दिव्य नववर्ष या विषयांवर प्रवचन होईल.

१२ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ४ यावेळेत भगवान महावीर जन्म कल्याणक वांचन अनुष्ठान होईल, त्याच दिवशी रात्री जन्मकल्याणकची अद्वितीय जिवंत प्रस्तुती सादर केली जाईल. तसेच १३ सप्टेंबर रोजी १८ वर्षांपर्यंतच्या मुला – मुलींसाठी ऐवंता आलोयणाची संगीतमय प्रस्तुती आहे. पर्युषण पर्व काळात सर्वांसाठी पांढऱ्या रंगाचा ड्रेस कोड असणार आहे. पर्युषण पर्व आत्म कल्याणकारी पर्व आहे. या काळात अधिकाधिक श्रावक, श्राविकांनी तपस्या उपवास करून आत्मशुद्धी करावी. आचार्यश्रींच्या पावन भूमीतील पर्युषण पर्व अतिभव्य तपस्येचे झाले पाहिजे. प्रत्येकाने आपल्या व्यस्त जीवनातून स्वतः साठी, स्वतःच्या आत्म कल्याणासाठी तसेच धर्मासाठी आवर्जून वेळ काढत या काळातील सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहावे, असे आवाहन उपाध्याय प्रविणऋषी महाराज यांनी केले आहे.

या पावन पर्युषण पर्वातील सर्व कार्यक्रमांना श्रावक श्राविकांनी सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटीचे सदस्यांनी केले आहे.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेत दहीहंडीचा जल्लोष

## राधा–कृष्णाच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी जिंकली उपस्थितांची मने

नगर – शहरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. राधा आणि श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सजलेल्या चिमुकल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गवळणी, कृष्णजन्माची गीते तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि जल्लोषमय झाले.


लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेत दहीहंडीचा जल्लोष करताना विद्यार्थी.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी हिंदी–मराठी गीतांवर नृत्य, नाट्यरूप सादरीकरण आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. चिमुकल्यांच्या उत्स्फूर्त सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. शाळेच्या अंगणात आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. फुले व रंगीबेरंगी फुग्यांनी परिसराची सुंदर सजावट करण्यात आली होती. दहीहंडी फोडण्याच्या क्षणी 'हाथी घोडा पालखी... जय कन्हैया लाल की!' या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर दणाणून गेला. लहानग्या गोविंदांच्या उत्साहात विद्यार्थी, शिक्षक आणि पालकही सहभागी झाले.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे उपस्थित होते. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका लक्ष्मीताई आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक महादेव भद्रे, प्राथमिकच्या शिक्षिका मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, सोनाली अनभुल, रूपाली वाबळे, कांचन मदने, भारती सुसरे, भाग्यश्री लोंढे, कविता हिरणवळे, इंदुमती दरेकर, पूनम धाडगे, रूपाली पांडुळे, सौ. जगताप, बिडवे मावशी तसेच विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

ज्ञानदेव पांडुळे म्हणाले, दहीहंडी हा केवळ धार्मिक उत्सव नसून एकतेचे प्रतीक आहे. सण–उत्सवांच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या एकात्म भारताचे दर्शन घडते. समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम अशा उत्सवांमधून होते. विद्यार्थ्यांमध्ये आपल्या संस्कृतीविषयी अभिमान निर्माण करण्याबरोबरच एकात्मतेची भावना रुजविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लिटिल स्कॉलर्स स्कूलमध्ये बाळगोपाळांनी फोडली दहीहंडी

नगर – तपोवन रोड येथील लिटिल स्कॉलर्स प्रि–प्रायमरी स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. चिमुकल्या बाळगोपाळांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत दहीहंडी उत्सवाचा आनंद लुटला. यावेळी शाळेच्या परिसरात उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.



दहीहंडीचा कार्यक्रम पाहण्यासाठी तपोवन रोड तसेच लक्ष्मी कॉलनी परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून उपस्थित पालकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. श्रीकृष्ण, राधा तसेच गोपाळांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

यावेळी शाळेच्या प्राचार्या संगीता जाधव यांनी विद्यार्थ्यांना दहीहंडी उत्सवाचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगितले. तसेच भगवान श्रीकृष्णाच्या बाललीला, गोपाळकाला आणि कृष्णाच्या विविध लीला यांची माहिती विद्यार्थ्यांना सोप्या व रंजक पद्धतीने दिली. सण–उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख करून देण्याचा शाळेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत दहीहंडी उत्सवात आनंदाची भर घातली. पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सणाचा आनंद घेण्याबरोबरच त्याम ागील संस्कृती आणि परंपरांची माहिती मिळाली.

कार्यक्रमासाठी शाळेच्या प्राचार्या संगीता जाधव, स्मिता थोरात, नम्रता गोळे आणि साक्षी भांड यांनी विशेष परिश्रम घेतले. पालक व परिसरातील नागरिकांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.


सेंट विवेकानंद प्राथमिक स्कूलमध्ये शो अँड टेल स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

# सेंट विवेकानंद स्कूलमध्ये शो ॲण्ड टेल स्पर्धा

नगर – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच त्यांच्यातील आत्मविश्वास, संभाषणकौशल्य आणि सादरीकरण क्षमता विकसित करण्याच्या उद्देशाने सेंट विवेकानंद प्राथमिक स्कूलमध्ये शो अँड टेल स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.

शाळेच्या मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विविध आकर्षक व ज्ञानवर्धक विषयांचे सादरीकरण केले. जलचक्र, सोलर पॅनल, ट्रॅफिक लाईट, घड्याळ, डॉक्टर, नारळ यांसारख्या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी कल्पकतेने व आत्मविश्वासाने माहिती सादर केली.

कांचन पापडेजा म्हणाल्या, चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने, प्रभावी वक्तृत्वाने आणि उत्कृष्ट सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यासोबतच संवादकौशल्य, निरीक्षणशक्ती, विचारशक्ती आणि मंचावरील आत्मविश्वास वाढण्यास मोलाची मदत होते. या स्पर्धेसाठी संस्थेचे विश्वस्त सुरेश हिरानंदानी, आरटीओ ऑफिसर प्रियंका चौथे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच या स्पर्धेसाठी संज्योत औताडे आणि तानिया मुलतानी यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. या स्पर्धेत जिजा कांबळे, बानिकौर गुलाटी, स्तवन अल्हाट, फलक हवलदार, अवनी भंडारी, पूर्वा पांडे, यश सुखेजा, आनंदी सरोदे, शिवांश वारुळे व आर्या पवार या विद्यार्थ्यांनी पुरस्कार पटकावले.

सूत्रसंचालन कनन शिरवाणी आणि प्रिती कटारिया यांनी केले. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी व हरेष मध्यान, तसेच मुख्याध्यापिका कांचन पापडेजा व माधमिक विभागाच्या प्राचार्या गीता तांबे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.

# राधाकृष्ण मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा

नगर – सर्जेपुरा येथील पंजाबी सनातन धर्मसभेच्या श्री राधाकृष्ण मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा झाला. जन्माष्टमीनिमित्त मंदिरातील श्री राधाकृष्ण मूर्तींची करण्यात आलेली मनोहारी सजावट, आकर्षक विद्युत रोषणाई आणि श्रीकृष्णाच्या बाल रूपातील छायाचित्रांनी साकारलेली सजावट लक्षवेधी ठरली. ५ सप्टेंबर रोजी बाके बिहारीलाल की जय..., भगवान गोपालकृष्ण की जय... असा जयजयकार करत भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. दर्शनासाठी पंजाबी, सिंधी समाजातील नागरिकांसह सर्व समाजघटकांतील भाविकांची रीघ लागली होती.


श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त सर्जेपुरा येथील श्री राधाकृष्ण मंदिरात पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांच्या हस्ते राधाकृष्णाची महाआरती करण्यात आली. याप्रसंगी प्रदीप पंजाबी, राकेश गुप्ता, मोहित पंजाबी यांच्यासह भाविक.

युगल शरण महाराज यांनी सादर केलेल्या श्रीकृष्णाच्या अवीट गोडीच्या भाजनांमध्ये उपस्थित भाविकांनी तल्लीन होत भगवंताचा जयघोष केला. श्रीकृष्ण जन्मास १० मिनिटांचा अवधी असताना युगल शरण महाराज यांनी आर्त स्वरात सादर केलेल्या डगमग डगमग डोले नैय्या आयो कृष्ण कन्हैया अवतर लो अवतार लो... या प्रार्थनारूपी भजनाने उपस्थित भाविक भावविभोर झाले. मध्यरात्री बरोबर १२ वाजता मंदिराचा पडदा उघडताच हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे। हरे राम हरे राम, राम राम हरे हरे।। अशा जयजयकाराने जन्मोत्सव साजरा झाला. यावेळी प्रमुख पाहुणे पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांच्या हस्ते राधाकृष्णाची महाआरती करण्यात आली.

पंजाबी समाजाचे अध्यक्ष प्रदीप पंजाबी, राधाकृष्ण मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या श्रीकृष्ण जन्म ोत्सव सोहळ्याचे यावर्षी मोठ्या उत्साहात व जल्लोषात आयोजन झाले होते.

श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला पंजाबी समाजाच्या वतीने शहरात प्रथमच संजोग लॉन्स येथे भजन जॅमिंग या अनोख्या भक्तिमय आधुनिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. युवा वर्गाला अध्यात्माशी जोडण्याच्या उद्देशाने आयोजित या अनोख्या उपक्रमाला हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आधुनिक संगीताच्या माध्यमातून तेजस गंभीर व कलाकारांनी सादर केलेल्या भजनांमध्ये तरुणाईसह नागरिक तल्लीन झाले. आ. संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे आणि धनश्री विखे यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून भजनांचा आनंद घेतला. युवा पिढीला भारतीय संस्कृती आणि अध्यात्माशी जोडण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला असल्याची माहिती नगरसेवक मोहित पंजाबी यांनी दिली.

